
# शंभरीतला हसवणारा माणूस


मी शि. द. फडणीस यांना आळखत होतोच पण, १९९२ मध्ये परिचय झाला आणि हळूहळू ओळखीचे रुपांतर स्नेहामध्ये झाले. अनेक वेळी, अनेक प्रसंगी आम्ही भेटलो. भेटत राहिलो. कामानिमित्ताने वा त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भेटीगाठी वाढत राहिल्या. माझ्या एका कॅलेंडरचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. त्यांच्या हस्ते मला 'गानवर्धन'चा पुरस्कारही देण्यात आला होता. या सगळ्यातून स्नेह वृद्धिंगत होत गेला.

मी फोटोसेशन केले तेव्हा ते ९४ वर्षांचे होते. त्यामुळे मला प्रकर्षाने त्यांच्यातील काही स्वभाववैशिष्ट्ये अनुभवायला मिळाली. त्यातील एक लखलखीत उठून दिसलेली बाब म्हणजे त्यांचा व्यवस्थितपणा. कलाकार म्हटल्यानंतर गबाळा राहायला हवा, लहरी असायला हवा, त्याने चित्रविचित्र कपडे घातले पाहिजे, कानात-गळ्यात काही घातले पाहिजे, केस वाढवून रबर लावले पाहिजे... असा एक विचार असतो. पण अशा कोणत्याही प्रकारचा दिखावा नसूनही ते इतके मोठे कलाकार आहेत! फोटोसेशनला आले असता त्यांनी स्वत: आपले फोल्ड करुन आणलेले इझल लावले. खरे तर ते सहाय्यकाकडून हे काम करवून घेऊ शकले असते. माझ्याकडील कोणाला, 'एवढे करुन द्या' असे सांगू शकले असते. पण ९४ वर्षी त्यांनी हे काम स्वत: केले. दिलेल्या म्हणजेच बरोबर चार वाजता ते स्टुडिओत हजर होते. इथेही कलाकार वक्तशीर नसतात, हा समज त्यांनी खोटा ठरवला. कारण सहसा कलावंत आपला लहरीपणा दाखवण्यासाठी, वेगळेपण समोर मांडण्यासाठी बरेच आढेवेढे घेतात. काम होईल की नाही माहिती नाही, तुम्ही सातत्याने पाठपुरावा करा, असे ते अगदी सहज म्हणून जातात. पण शि दं याला अपवाद आहेत. बाहेरच नव्हे, तर घरातही त्यांचा हा वक्तशीरपणा, टापटीप अनुभवायला मिळते. त्यांच्या दाराची बेल वाजवली की कधी ते तर कधी त्यांची पत्नी दार उघडायच्या. आतमध्ये जाताच लक्षात यायचे की ते बाहेर जाण्यास निघाले आहेत. इतके ते तयार होऊन बसलेले असायचे. एकदा मी त्यांना विचारलेही होते की, तुम्ही बाहेर निघाला असाल तर लगेच निघतो. तेव्हा त्यांचे उत्तर होते, 'नाही; आम्ही कुठेच निघालेलो नाही. घरातच आहोत...!' घरातही इतके टापटीप राहण्याची त्यांची सवय भावणारी आहे.

शंभर वर्षे वयातही मनाने तरुण असणारा हा चित्रकार आहे. समोरच्या माणसाचे शांतपणे ऐकून घेत, त्याच्या पातळीवर उतरुन बोलत, त्याचे काय नवीन चालले आहे हे जाणून घेत गप्पा फुलवणे त्यांना आवडते. आजही कधी त्यांना फोन केला की, नवीन काय चाललंय, हाच त्यांचा प्रश्न असतो. मुख्य म्हणजे ते दाखवत असणारी समयसूचकता उल्लेखनीय वाटते. एखाद्या प्रसंगाला साजेसे बोलण्यात त्यांचा हात धरु शकणारे फार थोडे लोक बघायला मिळतील. इथे एक किस्सा सांगतो. ९४ व्या वर्षानिमित्त त्यांचा सत्कार केला असता उत्तरादाखल ते म्हणाले होते, '९४ वर्षात पदार्पण केल्याबद्दल इथे माझा सत्कार होत आहे, पण ९४ वर्षे लागण्यासाठी मी काहीच केलेले नाही...' या साध्या वाक्याने त्यांनी रसिकांना आपलेसे करुन घेतले होते. सांगायचा मुद्दा हा की, मी खूप मोठा आहे हे सांगण्याचा वा दाखवण्याचा भाव त्यांच्या बोलण्यामध्ये कधीच डोकावत नाही.

त्यांच्या चित्रांबद्दल बोलायचे तर 'निर्विश अभिव्यक्ती' एवढेच शब्द पुरेसे आहेत. ते कधीच कोणाबद्दल वाईट बोलत नाहीत. कोणाचा दुस्वास करणे त्यांच्या स्वभावात नाही. वाईटापेक्षा चांगले काय आहे, हे ते शोधतात आणि त्यावरच बोलतात. त्यांचे स्वत:चे काम तर सर्वोत्तम आहेच. उत्तम रेषा, उत्तम आणि प्रसन्न रंगसंगती आणि चित्रातून येणारा विनोद ही त्यांची बलस्थाने आहेत. यामुळेच ७० वर्षांनंतरही त्यांची चित्रे फ्रेश वाटतात. १९५२ मध्ये त्यांचे पहिले चित्र दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावर झळकले आणि खूप चर्चा झाली. त्याच सुमारास 'ठंडी हवाए, लहराके आए' हे गाणेही आले. आजही लताबाईंच्या आवाजात ते ऐकतो तेव्हा खरोखर अंगावर थंड हवेची लहर आल्यासारखे वाटते आणि अगदी याच पद्धतीने 'मोहिनी'च्या अंकामधील शिदंचे ते चित्र पाहून हसू येते. इतक्यावेळा बघूनही त्याची खुमारी कमी होत नाही. अर्थातच हे वर उल्लेख केलेल्या सगळ्या गुणांमुळे घडले आहे. त्यांनी संपूर्ण आयुष्य कलेला समर्पित केले. अगदी वयाची शंभर वर्षे पूर्ण केल्यानंतर केल्या गेलेल्या सत्कारसमारंभातील भाषणातही त्यांनी मस्त टोलेबाजी केली आणि वय हा केवळ एक आकडा असल्याचे दाखवून दिले. यावेळी त्यांनी कोल्हापूरच्या आठवणी काढल्या. तेथे दोन गोष्टींचा पाठपुरावा केला जातो, एक म्हणजे चित्रकला आणि दुसरी तालीम.. असे म्हणत ते पुढे म्हणाले, मी दोन्ही करण्याचा प्रयत्न केला. पण त्यातील एकच जमले. काय जमले हे तुम्हाला माहिती आहे, असा पंच त्यांनी टाकला. वयाच्या शंभराव्या वर्षी हातात कागद न घेता हजार एक लोकांसमोर बोलणे आणि बोलताना प्रत्येकाला हसवत ठेवणे ही फार मोठी गोष्ट आहे. शिदंना ती साधली आहे. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि अनेकानेक शुभेच्छा.








गौरव

**सतिश पाकणीकर**
प्रसिद्ध छायाचित्रकार

**शि. द. फडणीस यांनी संपूर्ण आयुष्य कलेसाठी समर्पित केले. वयाची शंभर वर्षे पूर्ण केल्यानंतर सत्कारसमारंभातील भाषणातही त्यांनी मस्त टोलेबाजी केली आणि वय हा केवळ एक आकडा असल्याचे दाखवून दिले. त्यांच्या चित्रांबद्दल बोलायला 'निर्विश अभिव्यक्ती' एवढेच शब्द पुरेसे आहेत. उत्तम रेषा, उत्तम आणि प्रसन्न रंगसंगती आणि त्यातून पुढे येणारा विनोद ही त्यांची बलस्थानेआहेत.**

✦✦✦

## कला आणि कल्पना यांचा संगम

– **चारुहास पंडीत**, प्रसिध्द व्यंगचित्रकार



त्यांची चित्रे बघताना नेहमीच एक आल्हाद जाणवतो. कामाचे हे देखील एक वैशिष्ट्य म्हणता येईल. त्यांनी तांबडा वा पिवळा असे भडक रंग वापरले तरी डोळ्याला खुपत नाहीत, कारण आसपास वापरलेल्या रंगांनी निर्माण केलेले वातावरण चित्र आल्हाददायक करते. त्यात कठोरपणा नावालाही राहात नाही. त्यांच्या चित्रातील आकारही साधे आहेत. इंग्रजीतला 'सिंप्लीफाईड' हा चपखल शब्द यासाठी योग्य ठरेल. पण असे असले तरी चित्रातील प्रत्येक आकार आपले म्हणणे ठसठशीतपणे मांडत असतो. तो या अर्थाने की, त्यांनी चितारलेली कोणतीही फिगर ताठ, सरळ उभी असलेली दिसत नाही. त्यात एक लय असते. शिदंच्या चित्रातील ही लयही फार महत्त्वाची वाटते, कारण त्यामुळेच त्यांचे चित्र अत्यंत आकर्षक दिसते. खेरीज एखाद्याने चित्र कसे बघावे, या दृष्टीने त्यांनी चित्रांची मांडणी केलेली दिसते. म्हणजेच मुख्य विषय काय, तो चित्रात कशा पद्धतीने यायला हवा याचा विचार करुनच त्यांनी चित्र काढलेले असते. यामुळेच बघणाऱ्याला ते कसे पहावे, याची दृष्टी मिळते. चित्रांची नक्कल करणे, हुबेहुब चित्र साकारणे हे प्रकार या क्षेत्रात अगदी सर्रास घडतात. असे असताना शिदंच्या स्टाईलची कॉपी फारशी दिसत नाही, हेदेखील एक वैशिष्ट्य वा वेगळेपण म्हणावे लागेल. याचे कारण म्हणजे त्यांच्या चित्रांमध्ये असणारा सोपेपणा हेच खूप अवघड काम आहे! शेवटी हास्यचित्र म्हणजे कला आणि कल्पना यांचा संगम असतो. एखाद्याकडे नुसती कला असून उपयोग नसतो. एखाद्याकडे कल्पना आहे पण कला ती पोहचवू शकत नसल्यास उपयोग नसतो. या दोन्हीचा समतोल साधला जातो तेव्हाच एक सकस कलाकृती तयार होते आणि अनेक वर्ष टिकून राहते. हा समतोल शिदंच्या चित्रांमध्ये पहायला मिळतो. कल्पनाचित्रांमधून पूर्णपणे उमटलेला दिसतो. म्हणूनच त्यांची चित्रे आजही लक्षवेधी ठरतात.

# जनसुरक्षा कायद्यामुळे लोकशाहीच्या चौकटीलाच धक्का

गेल्या वर्षभरापासून राज्यात गदारोळ माजवणारे जनसुरक्षा विधेयक सुधारित तरतुदींसह नुकतेच विधानसभेत मंजूर झाले. हे विधेयक आल्यावर डाव्या संघटना आणि डाव्या संघटनांशी संबंधित लोकांना अटक केली जाईल, त्यांच्यावर दडपशाही आणि बळाचा वापर केला जाईल, अशी भीती विविध संघटना आणि विरोधकांनी व्यक्त केली होती. असे काही होणार नसल्याची ग्वाही फडणवीस यांनी दिली; परंतु मुळात या कायद्याची खरेच गरज होती का, हा प्रश्न अनुत्तरीत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देशातून पुढच्या वर्षअखेर नक्षलवाद संपवण्याचा निर्धार केला आहे. छत्तीसगड, झारखंडमध्ये नक्षलवाद्यांचा मोठ्या प्रमाणात खात्मा झाला आहे. महाराष्ट्रातही अर्ध्या गडचिरोलीतून नक्षलवाद संपला आहे. तेलंगणा, आंध्र प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आदी राज्यांमध्येही नक्षलवाद्यांची संख्या कमी झाली आहे. सुरक्षा यंत्रणांनी समन्वयाने नक्षलवाद संपवत आणला आहे. नक्षलवाद संपत आला असताना आता जनसुरक्षा कायद्याची खरेच गरज होती का, या प्रश्नाचेही नीट उत्तर मिळत नाही. दुसरा सर्वात महत्त्वाचा मुद्दा शहरी नक्षलवाद्यांचा आहे. हा कायदा करण्यासाठी शहरी नक्षलवाद्यांचे कारण पुढे केले जात आहे; परंतु शहरी नक्षलवादी म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, त्यांचा संबंध पुस्तके आणि साहित्यापुरता मर्यादित असतो. ते कधीच शस्त्र हाती धरत नाहीत. सरकारला त्यांची एवढी भीती का वाटावी, हा ही प्रश्नच आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये सरकारने आदिवासी भागातील विकासावर भर दिला आहे. स्थानिक लोकांची पूर्वी नक्षलवाद्यांना साथ होती. नक्षलवाद्यांबाबत नागरिकांचा भ्रमनिरास झाला आहे. नागरिकांची त्यांना साथ राहिलेली नाही. शिवाय माणसे मारली म्हणजे विचार मरत नसतो, तर चुकीचा विचार निर्माण होणारच नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे; परंतु जनसुरक्षा विधेयक मंजूर करताना या वास्तवाचा विचार कुणीही केलेला नाही. नक्षलवादाला आळा घालण्यासाठी देशात विविध कायदे आहेत. त्यात सुधारणाही झाल्या आहेत. आता नक्षलवाद संपत आला असताना नवा कायदा करण्यात आला आहे. त्यातील अनेक तरतुदी वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. कायद्याचा कसा दुरुपयोग केला जातो, हे मणिपूरच्या पत्रकाराला तीन-चार वर्षे तुरुंगात कसे ठेवले, यावरून मध्यंतरी पुढे आले होतेच. अशी अनेक उदाहरणे देशात घडली आहेत. हा कायदा कुणाला त्रास देण्यासाठी नाही, तर आपल्याच देशातील लोकांना भरीस पाडून चिथावणी देणाऱ्यांना आळा घालण्यासाठी हा कायदा करण्यात आल्याचे समर्थन केले जाते. हा कायदा कुठल्याही डाव्या विचारांच्या पक्षाविरोधात नाही, तर कडवट विचारांच्या आणि हिंसेच्या मार्गाने लढा देऊ पाहणाऱ्यांच्या विरोधातच असेल. संसदीय लोकशाहीच्या मार्गाने चालणाऱ्या सीपीआय, सीपीएम या पक्षांचा आणि त्यातील नेत्यांचा आदर असल्याचे फडणवीस यांनी सांगितले; परंतु महाराष्ट्राच्या विधानसभेत आ. विनोद निकोले या एकमेव आमदाराने या कायद्याला विरोध करताना सामान्यांच्या मूलभूत हक्कांवर हा कायदा कसा गदा आणेल, हे सांगितले.




लोकशाही मार्गाने सरकारला विरोध करण्याचा अधिकार असल्याचे सांगितले जात असले, तरी हा कायदा नसतानाच लोकांची गळचेपी होते, तर हा कायदा लागू झाल्यानंतर ती किती होईल, हे सांगणे अवघड आहे. विरोधी पक्षांच्या आमदारांची संख्या विधिमंडळात कमी असली, तरी त्यांना या मुद्यावर व्यवस्थित म्हणणे मांडता आले असते. त्यांच्यापैकी निकोले वगळता कुणीही तोंड उघडले नाही. तज्ज्ञ, अभ्यासक या कायद्यावर बोलायला लागले आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जेव्हा कानउघाडणी केली, तेव्हा मात्र विरोधकांना या कायद्याविरोधात कंठ फुटला. जुलै २०२४ रोजी सरकारने हे विधेयक आणले होते; परंतु यातील काही तरतुदींवर कडाडून टीका झाली. त्यामुळे ते संयुक्त समितीकडे पाठवण्यात आले होते. समितीने केलेल्या सुधारणांनुसार विधेयकात बदल करण्यात आले. त्यानंतर त्याचा कायदा झाला. मूळ विधेयकात 'व्यक्ती आणि संघटनांच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी' अशी तरतूद होती. त्याऐवजी 'कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटनांच्या किंवा त्यासारख्या संघटनांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांचा प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरीता तरतूद करण्यासाठी विधेयक' असा बदल करण्यात आला आहे. मूळ विधेयकात 'व्यक्ती आणि संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना अधिक प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक अशी तरतूद होती. आता मात्र 'ज्या अर्थी कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटनांच्या किंवा त्यासारख्या संघटनांच्या बेकायदेशीर कृत्यांमुळे सार्वजनिक सुव्यवस्था धोक्यात येत आहे आणि अशी कृत्ये कायद्याची अंमलबजावणी करण्यामध्ये आणि सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यात हस्तक्षेप करतात आणि ज्या अर्थी कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटनांच्या किंवा त्यासारख्या संघटनांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांचा प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी नवीन कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे' असे विधेयकात म्हटले आहे.

**गेल्या वर्षभरापासून जनसुरक्षा विधेयकाची चर्चा होती. आता हे विधेयक मंजूर झाले असले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या शंकाना उत्तर देण्याची अजूनही तयारी दाखवली असली, तरी सर्वोच्च न्यायालयाचा पूर्वीचा एक निकाल पाहता जनसुरक्षा विधेयकामुळे मूलभूत अधिकारांचा संकोच होत आहे, ही वस्तुस्थिती उरतेच. न्यायव्यवस्था आणि नक्षलवादाचा गाढा अभ्यास असणारे हा कायदा कसा निरूपयोगी आहे, हे पटवून देत आहेत.**

यापूर्वीही जनसुरक्षा विधेयकातील कठोर तरतुदींना सामाजिक संघटनांनी आणि राजकीय विरोधी पक्षांनी विरोध दर्शवला होता. व्यक्ती आणि संघटना अशी तरतूद असल्यास सरकारला विरोध करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती अथवा संघटनेवर कारवाईचा अधिकार सरकारला प्राप्त झाला असता, असे म्हटले जात होते. यामुळे व्यक्ती आणि संघटना ही शब्दरचना बदलण्यात आली आहे. विधेयकावर १२ हजार ५०० सूचना प्राप्त झाल्या. चिकित्सा समितीच्या म्हणण्याप्रमाणे, मसुद्यात तीन मुख्य बदल करण्यात आले आहेत. राज्य शासनाने नियुक्त केलेला, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा सेवानिवृत्त न्यायाधीश सल्लागार मंडळाच्या अध्यक्षपदी तर दोन सदस्य; त्यापैकी एक सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश आणि दुसरा सदस्य उच्च न्यायालयातील सरकारी वकील सदस्यपदी असतील. या कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्याची चौकशी पोलिस उपनिरीक्षकांऐवजी पोलिस उपअधीक्षक दर्जाचे अधिकारी करतील. विधेयकाच्या मूळ हेतू वाक्यात बदल करून डाव्या विचारसरणीच्या किंवा तत्सम बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध करण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे विधेयकाचा वापर राजकीय किंवा सामाजिक संघटनांविरुद्ध होणार नाही, असे समितीचे म्हणणे आहे. या कायद्यानुसारचे सर्व गुन्हे दखलपात्र असून त्यात जामीन मिळणार नाही.

संघटनांच्या मालमत्तेचा शासनाने ताबा घेतल्यास संबंधित अधिकाऱ्याच्या विरोधात दिवाणी किंवा फौजदारी दावा करता येणार नाही. जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय अधिसूचित जागेत प्रवेश केल्यास तो फौजदारी प्रवेश मानला जाईल. या तरतुदीमुळे सामान्य नागरिकांचे हक्क अडचणीत आले आहेत. विशेष जनसुरक्षा विधेयक हे केवळ कायदेशीर दस्तावेज नाही, तर लोकशाहीच्या आत्म्यावर कोरलेली एक गुंतागुंतीची कथा आहे. 'शहरी नक्षलवाद' आणि 'लोकशाहीविरोधी संघटना' यांच्या प्रतिबंधाच्या नावाखाली रचलेला हा कायदा, प्रत्यक्षात स्वातंत्र्य आणि सुरक्षेच्या नाजूक संतुलनाला आव्हान देतो. १२,५०० हरकतींच्या सावटाखाली घडवलेला हा मसुदा अस्पष्ट व्याख्या, अतिरेकी पोलिस अधिकार आणि गोपनीयतेच्या अभेद्य पडद्यांमुळे एका भयावह वास्तवाची नांदी ठरतो. सुरक्षेच्या नावाखाली तिथे स्वातंत्र्याचा श्वास कोंडला जातो. हा कायदा दडपशाहीचा कायदेशीर मुखवटा नाही, तर सत्ताधारी आणि विरोधकांच्या संमतीने नागरिकांच्या संविधानिक स्वातंत्र्यावर लादलेला सामूहिक संहार आहे. यातून व्यक्त होणारा सामाजिक उद्वेग, राजकीय संताप आणि नैतिक आक्रोश केवळ कृत्रिम प्रतिक्रिया नाही; ती एक सजीव, सजीवतेला शरण गेलेली आणि शेवटच्या हद्दीवर लढणाऱ्या लोकशाहीची शुद्ध हाक आहे. 'अर्बन नक्सल ही संकल्पना सरकारच्या गृहखात्याने नाकारलेली असतानाही पत्रकार, लेखक, अभ्यासक यांना तुरुंगात टाकणे ही केवळ दडपशाही नव्हे, तर ती विचार करण्याच्या स्वातंत्र्याची गळचेपी आहे. 'बेकायदेशीर कृती' किंवा 'कडवे विचार' यासारख्या संज्ञांना कोणतीही स्पष्ट वैधानिक सीमा नाही. यामुळे सरकारला सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, शेतकरी आंदोलक, पर्यावरणवादी किंवा धारावी पुनर्विकासासारख्या स्थानिक चळवळींना 'लोकशाहीविरोधी' ठरवण्याची मोकळीक मिळते. ही अस्पष्टता केवळ कायदेशीर त्रुटी नाही; ती एक नियोजित रणनीती आहे, जिथे सत्तेच्या हातात विरोधाचे स्वर मूक करण्याची अनियंत्रित शक्ती येते.

नोंद

**शिवाजी कराळे**, विधिज्ञ

✦✦✦

# आर्थिक विकासाची गाडी वेगात...

**भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक सकारात्मक पैलू आहेत. मजबूत विकासदर, वाढती उत्पादनक्षमता, ग्राहक बाजारपेठेचा आकार आणि सरकारी सुधारणा यांचा त्यात समावेश आहे. विविध क्षेत्रांमध्ये वाढ आणि रोजगार निर्मिती हेदेखील सकारात्मक चिन्ह आहे. अर्थात बाह्य आव्हाने भारताच्या विकास क्षमतेला धक्का देऊ शकतात, असा इशारा अर्थ मंत्रालयाने दिला आहे. ताज्या आर्थिक चित्राचा अंदाज या तपशिलामधून येऊ शकतो.**






परामर्श

हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार

भारतीय अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि २०२५–२६ मध्येही सकारात्मक प्रगती सुरू राहण्याची अपेक्षा आहे. २०२५–२६ मध्ये ती ६.२ टक्के आणि २०२६ मध्ये ६.३ टक्के राहण्याचा अंदाज आहे. सरकारचा 'मेक इन इंडिया' कार्यक्रम आणि इतर उपक्रम उत्पादन क्षेत्राला चालना देत आहेत. त्यामुळे औद्योगिक उत्पादनात वाढ होत आहे. भारताची प्रचंड ग्राहक बाजारपेठ आणि वाढती खरेदी शक्ती गुंतवणूकदारांसाठी आकर्षक समिकरण बनते. 'डिजिटल इंडिया' आणि इतर सुधारणांमुळे आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटने(ईपीएफओ) अंतर्गत निव्वळ वेतन वाढीवरून दिसून येते की, औपचारिक नोकऱ्यांची निर्मितीदेखील वाढत आहे. कृषी, उत्पादन आणि सेवा क्षेत्रे भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. आज भारतात थेट परकीय गुंतवणुकीत (एफडीआय) वाढ झाली आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत भारताचे महत्त्व वाढत आहे आणि युरोपीय महासंघासारख्या प्रमुख आर्थिक भागीदारांशी त्याचे संबंध मजबूत होत आहेत. घाऊक किंमत निर्देशांकात (डब्ल्यूपीआय) घट आणि किरकोळ महागाईत घट हीदेखील सकारात्मक चिन्हे आहेत. जागतिक अस्थिरतेच्या काळातही भारतीय अर्थव्यवस्थेचा दृष्टिकोन सकारात्मक आहे. कारण महागाईत घट, लवचिक बाह्य क्षेत्र आणि स्थिर रोजगार परिस्थिती यामुळे हे शक्य झाले आहे. २०२६–२७ या आर्थिक वर्षामध्ये पहिल्या दोन महिन्यांमध्ये आर्थिक क्रियाकलाप स्थिर राहिले; परंतु बाह्य आव्हाने भारताच्या विकास क्षमतेला धक्का देऊ शकतात, असा इशारा अर्थ मंत्रालयाने दिला आहे.

आर्थिक आढाव्यामध्ये पुढे म्हटले आहे की मे २०२५ मध्ये किरकोळ आणि अन्न–किंमत महागाईमध्ये सतत आणि व्यापक घट झाली, कारण मजबूत कृषी उत्पादन आणि प्रभावी सरकारी हस्तक्षेप. देशांतर्गत निदर्शक मोठ्या प्रमाणात सकारात्मक राहिले असले, तरी बाह्य घडामोडींमुळे वित्तीय बाजारपेठांमध्ये अस्थिरता दिसून आली आहे. २०२५ च्या सुरुवातीला व्यापार तणावात लक्षणीय वाढ आणि त्यानंतर दुसऱ्या तिमाहीमध्ये तणाव अंशतः कमी झाल्यामुळे वित्तीय बाजारपेठांमध्ये लक्षणीय अस्थिरता निर्माण झाली आहे. जागतिक तणाव आणि आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणातील अनिश्चितता हे वर्तमान असले, तरी चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था ६.५ टक्क्यांनी वाढेल, असा आत्मविश्वास पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष एस. महेंद्र देव यांनी व्यक्त केला आहे. देशात सर्वत्र उत्तम पाऊस आहे. त्याचप्रमाणे बँकांचे व्याजदर कमी आहेत. सलग तीन वेळा भारतीय रिझर्व्ह बँकेने व्याजदरांना कात्री लावली आहे. त्यामुळे घाऊक पातळीवरील महागाई अतिशय कमी आहे. जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये सर्वाधिक वेगाने धावणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताचा उल्लेख करावा लागेल, असे देव यांनी म्हटले असून त्यांचा हा दावा योग्यच आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांमधील आर्थिक वाढ उत्तम राहिली आहे. आर्थिक व्यवस्थापन यथायोग्य असल्यामुळे मध्यमकालीन विकासगतीही चांगली राहील, अशी अपेक्षा आहे.

केंद्र सरकारने भांडवली खर्चात भरघोस वाढ करण्याचे ठरवले असल्याने खासगी उपभोगही वाढेल. अर्थात आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) आणि जागतिक बँकेने २०२५–२६ मध्ये भारताचा विकासदर अनुक्रमे ६.२ टक्के आणि ६.३ टक्के असा राहील, अशी शक्यता व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची व्यापार धोरणे अतिशय आक्रमक असून जागतिक व्यापाराला पोषक नाहीत. तसेच रशिया–युक्रेन युद्ध थांबायला तयार नाही आणि इस्त्रायल कधीही आणि कुठेही बॉम्बहल्ले करू शकतो. याचा फटका जागतिक व्यापाराला बसून भारतालाही याची झळ पोहचेल, अशी भीती जागतिक अर्थसंस्थांना वाटत आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात मध्यमवर्गाला भरपूर करसवलती देण्यात आल्या होत्या, त्याचप्रमाणे रस्ते, महामार्ग, पूल, बंदरे, विमानतळ या पायाभूत सुविधांसाठी लक्षणीय तरतूद करण्यात आली होती. त्यातच रिझर्व्ह बँकेने सीआरआर म्हणजेच बँकांच्या रोख राखीव प्रमाणात कपात केली आहे. या सगळ्याचा परिणाम होऊन ग्रामीण आणि शहरी भागातील मागणी वाढेल. कारण मुळातच स्वस्तात कर्जपुरवठा होत असल्यामुळे देशी आणि विदेशी गुंतवणुकीत भर पडेल आणि असंख्य लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळेल. लोकांच्या हातात अधिक पैसा खुळखुळायला लागेल. यामुळे विविध माल आणि सेवांची मागणी वाढणार असून, अर्थव्यवस्थेचे आरोग्य सुधारणार आहे, असे सरकारला वाटते.

एकीकडे मागणी वाढेल आणि दुसरीकडे शेती, उत्पादन आणि सेवाक्षेत्र यांची भरभराट होईल. म्हणजेच पुरवठ्याची बाजू भरभक्कम असेल, असा होरा आहे. जून महिन्यात ग्राहक मूल्य निर्देशांकावर आधारित हेडलाइन इन्फ्लेशन, म्हणजेच सर्व वस्तू आणि सेवांचा समावेश असलेला चलनवाढीचा दर हा केवळ २.१० टक्के होता. मागच्या सहा वर्षांमधला हा सर्वात कमी दर होय. कच्च्या तेलाचे भाव सध्या संपूर्णपणे नियंत्रणात आहेत. जून महिन्यातील फूड इन्फ्लेशन किंवा अन्नधान्याची महागाई फक्त १.०६ टक्के होती. संपूर्ण आर्थिक वर्षात चलनफुगवट्याचा दर सरासरी फक्त ३.६० टक्के असेल, असा रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे. चार टक्क्यांच्या आतील महागाई ही कमीच आहे, असे मानले जाते. २०२४ मध्ये जगातील थेट प्रत्यक्ष गुंतवणूक, म्हणजेच एफडीआय ३.७ टक्के इतकी वाढली. जगातील एकूण विदेशी गुंतवणूक गेल्या वर्षी १५०९ अब्ज डॉलर्स इतकी होती. २०१५ मध्येही हे प्रमाण २२१९ अब्ज डॉलर्स इतके होते. म्हणजेच जागतिक एफडीआयमध्ये हळूहळू घट होत आहे. परंतु भारताच्या एफडीआयमध्ये २०२४–२५ या वर्षात १४ टक्क्यांची वाढ झाली. अर्थात त्याच वेळी भारतातून बाहेर जाणारी गुंतवणूक ही काही कमी नव्हती. २०२३–२४ पेक्षा २०२४–२५ मध्ये परदेशस्थांच्या ठेवी आणि 'एक्सटर्नल कमर्शियल बॉरोइंग्ज'मध्ये जादा आवक झाली. महाराष्ट्रासारखी अनेक राज्ये मोठ्या प्रमाणात परदेशी गुंतवणूक आकर्षित करून घेत आहेत.

आज खासगी कंपन्या आणि राष्ट्रीयीकृत बँकांचा नफाही वाढत चालला आहे. भारतात आता भांडवलाची चणचण नाही. अनेक कंपन्या जागतिक अनिश्चिततेमुळे विस्तार करण्याचा निर्णय लांबणीवर टाकत आहेत, हे खरे आहे. चीनसारख्या देशांना अतिरिक्त उत्पादनक्षमतेचा फटका बसत आहे. परंतु भारतात ग्रामीण भाग आणि शहरांमध्ये मागणीमध्ये वाढच होणार असल्याचे केंद्र सरकारला वाटत आहे. एक स्वागतार्ह बाब म्हणजे भारतातील अनेक कंपन्या कर्जमुक्त झाल्या असून त्यांच्या ताळेबंदात शिल्लकही वाढत चालली आहे. कंपन्यांनी ती नवीन प्रकल्पांमध्ये गुंतवली पाहिजे. केंद्र सरकारने 'ईझ ऑफ डुइंग बिझिनेस'वर भर दिला असला तरी बहुसंख्य राज्यांमध्ये आजही त्या दिशेने फारशी प्रगती झालेली नाही, हे कटू असले, तरी वास्तव आहे. आजही जमीन संपादन, बिगरशेतीचा दाखला, औद्योगिक परवाना, राज्य सरकारचे अनुदान मिळणे, कर्जमंजुरी अशा अनेक कामांसाठी अडवणूक केली जाते किंवा पैसे मागितले जातात. उद्योजकांकडून राजरोसपणे खंडणी वसूल करणारे गुंड गावागावांत आहेत. हे सर्व बदलल्यास, अर्थव्यवस्थेचा वेग वाढेल, यात शंका नाही. मात्र त्याचवेळी केंद्र सरकारने निर्यातप्रधान उद्योगांना अधिक प्रोत्साहन दिले पाहिजे. त्याचप्रमाणे देशातील औद्योगिक संशोधनालाही सवलती देण्याची गरज आहे.

✦✦✦

# कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी लष्करी वापर

**आज औद्योगिक क्षेत्रापासून घराची साफसफाई करण्यापर्यंत विविध ठिकाणी हुकमी अस्त्र ठरणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर माणसाला शक्य नसलेल्या वेगाने आणि अचूकतेने सूक्ष्म तसेच धोकादायक कामे करण्यासाठीही होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, बिग डेटा ॲनॅलिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा अधिकाधिक स्वायत्त म्हणजे स्वयंभू बनत आहेत.**



सध्या संगणकीय बुद्धिमत्तेचा म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता उर्फ आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा सगळीकडे बोलबाला आहे. अशा हुषार संगणकीय प्रणालींचा वापर औद्योगिक क्षेत्रापासून घराची साफसफाई करण्यापर्यंत अक्षरशः सर्वत्र होऊ लागला आहे आणि संगणकाने किंवा यंत्रमानवाने करण्याच्या कामांची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. माणसानेच बनवलेल्या यंत्रणा, माणसाला शक्यच नसलेल्या वेगाने आणि अचूकतेने सूक्ष्म तसेच धोकादायक कामे पटापट करताना पाहूनच थक्क व्हायला होते. असे म्हणायचे कारण म्हणजे हल्ली संगणकीय प्रगतीचा वेग इतका जबरदस्त झाला आहे की आपण त्याचे आश्चर्य करणेच सोडून देऊ की काय, असे वाटू लागले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, बिग डेटा नॅलिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा अधिकाधिक स्वायत्त म्हणजे स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आणि स्वयंभू बनत आहेत यात शंकाच नाही. लष्कराच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व सर्वसामान्यांच्या दैनंदिन व्यवहारांमधील संगणकीकरणाच्या तुलनेने जास्त आहे, कारण अशा सिस्टीम्स मानवी मेंदूपेक्षा कैकपट जास्त वेगाने निर्णय घेऊन तितक्याच त्वरेने अमलात आणू शकतात, तेही अधिक अचूकतेने. उदा. ताशी शेकडो किलोमीटर वेगाने वाट्टेल तशी वळणे घेणाऱ्या विमानाच्या मागे सोडलेले क्षेपणास्त्र किंवा हजारो किलोमीटर अंतरावरून दुसऱ्या देशातील विशिष्ट लक्ष्यावर सोडलेले भू–लक्ष्यवेधी क्षेपणास्त्र. वाटेतील भौगोलिक तसेच मानवनिर्मित अडथळे टाळून अशी 'गायडेड मिसाइल्स' ठिकाणावर अचूक पोचतात ती त्यांना पुरवलेल्या माहितीचे झटपट विश्लेषण करण्याच्या संगणकीय क्षमतेमुळेच. त्याची माहिती विशेष रंजक आहे.

लष्करी वापराच्या तंत्रामध्ये इस्त्राइल जास्त तरबेज आहे. इस्त्रायलने आपल्या युद्धांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला आहे. यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर युद्धाचा समावेश आहे. हेरगिरीचे आणि युद्धाचे पारंपारिक स्वरूप झपाट्याने बदलले आहे हे खरे. विविध देश 'कोल्ड वॉर'कडून 'कोड वॉर'कडे जात असताना प्रत्यक्ष आघाडीवर बंदुका, विमाने, रणगाडे वगैरे साहित्य वापरून लढल्या जाणाऱ्या चकमकींचे प्रमाण कमी होईल. बदलत्या काळानुसार तंत्रेही बदलली असल्याने 'शस्त्र हे शस्त्रासारखेच दिसले पाहिजे' असा पारंपारिक आग्रह धरण्याचेही दिवस संपले आहेत. सध्या अत्यंत अचूक आणि कार्यक्षम इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा आणि त्याहीपेक्षा सूक्ष्म तंत्रज्ञानाचा जमाना आहे. ड्रोन (चालकरहित दूरनियंत्रित विमान) हे याचे आदर्श उदाहरण आहे. नवतंत्रज्ञानाचा आविष्कार दाखवणारी युद्धे सध्या युक्रेन रशिया, इज्राइल, सीरिया, जॉर्डन इत्यादी क्षेत्रांमध्ये चालू आहेत. सातत्याने युद्धग्रस्त असलेला प्रदेश म्हणजे इस्त्राइल–पॅलेस्टाइन, असे म्हणायला हरकत नाही. इस्त्रायलची शेतीपासून पर्यटनापर्यंतच्या अनेक क्षेत्रांमधली तांत्रिक झेप आपल्याला माहीतच आहे. त्यामुळे इस्त्रायलचे लष्कर आणि गुप्तचर संघटना (मोसाद) याला अपवाद असू शकतच नाही.



काही वर्षांपूर्वी इस्त्रायलने संगणकीय दूरनियंत्रित साप (रोबो–रेप्टाइल) तयार करून शत्रुप्रदेशात सोडले होते. असा साप अगदी खऱ्या सापांसारखाच दिसतो. त्याचे डोके म्हणजे कॅमेरा असतो. तो लष्करी किंवा इतर महत्त्वाच्या स्थानांभोवती फिरून, तेथील फोटो लगेच प्रक्षेपित करतो आणि गवतातून वा कुंपणाच्या कडेकडेने सरपटत परत येतो. आता इस्त्रायलने इलेक्ट्रॉनिक दूरनियंत्रित संगणकीकृत फुलपाखरे तयार केली आहेत. पॅलेस्टाइनमधील हमास चळवळीच्या कार्यकर्त्यांनी गाझा किनारपट्टीवर अशी भिरभिरणारी फुलपाखरे पकडल्याचा दावा केला आहे. कबुतरांच्या अंगावर छोटा कॅमेरा बसवून अद्यापही हेरगिरी केली जातेच. परंतु त्यापेक्षा हे फुलपाखरू अधिक प्रभावी आहे, कारण ते आकाराने छोट्या पक्ष्यापेक्षाही लहान असल्याने चक्क खोलीच्या खिडकीतून आत जाऊन टेहळणी करून दोन–चार सेकंदांमध्ये बाहेरही येऊ शकते. यामध्ये जीपीएस वगैरे इतर यंत्रणा बसवलेली असतेच, शिवाय यामध्ये चेहरा ओळखणारे (फेस रेकग्निशन) सॉफ्टवेअरही असावे, असा अंदाज आहे, कारण हमासने पकडलेल्या फुलपाखरामध्ये बेपत्ता तसेच युद्धकैदी इस्त्रायली सैनिकांची छायाचित्रे आढळली. इज्रायलने युद्धामध्ये, सायबर तंत्रज्ञान, आणि स्वयंचलित प्रणालींचा अत्यंत कार्यक्षम वापर केला आहे. ही आधुनिक युद्धशैली केवळ शारीरिक लढाईवर अवलंबून न राहता डिजिटल आणि माहिती–आधारित युद्धाच्या दिशेने सरकत आहे. उद्याची युद्धे हाडामासाचे सैनिक न लढता आपले तंत्र विरुद्ध शत्रूचे तंत्र अशी असू शकते.



कृत्रिम बुद्धिमत्तेमध्येही विविध पातळ्या असतात, त्यांपैकी दोन मुख्य अशा नॅरो (उर्फ मर्यादित) आणि जनरल (सर्वसाधारण किंवा सर्वसमावेशक म्हणू). 'नॅरो'चा वापर होताना आपण अनेक ठिकाणी पाहतो आणि अनुभवतो. इमेलचे स्पॅम फिल्टर, ऑटो सर्च, ऑटो ट्रान्सलेट, स्वयंचलित वाहने, घटना किंवा दस्तवेजांची वर्गवारी तसेच क्रम लावणे, (आपल्याबरोबर) बुद्धिबळ किंवा अन्य बोर्ड गेम्स खेळणारा संगणक आता आढळतात. मात्र 'जनरल ए आय' हे जरा वेगळे प्रकरण आहे. अशा प्रणाली जवळजवळ माणसाप्रमाणे विचार करून निर्णय घेऊ शकतील, भावभावना आणि शब्दांमागचा खरा अर्थही बऱ्यापैकी समजू शकतील आणि मुख्य म्हणजे केलेल्या चुका आणि अनुभवांमधून शिकू शकतील! नॅरो आणि जनरल अशा दोन्ही 'ए आय'चा वापर लष्करी आणि सायबर हल्ल्यांच्या संदर्भात अतिशय प्रभावीपणे केला जाऊ शकतो हे मात्र आत्ताच सिद्ध झाले आहे. उदाहरणार्थ मर्यादित बौद्धिक क्षमतेची 'ड्रोन्स' म्हणजेच छोटी दूरनियंत्रित स्वयंचलित विमाने फार मोठ्या संख्येने शत्रूच्या प्रदेशात सोडणे. त्यांची संख्याच इतकी प्रचंड ठेवायची की शत्रूने प्रत्येक ड्रोन शोधून नष्ट करेपर्यंत त्यांनी पुरेशी माहिती मायदेशी पाठवलेली असेल किंवा मालमत्तेचे भयंकर नुकसान केले असेल. याला 'स्वार्मिंग' असे नाव आहे (विशेषतः टोळांसारख्या घातक कीटकांच्या समूहाला स्वार्म म्हणतात) लष्करी (उघड तसेच छुप्या हल्ल्यांसाठीही) स्वार्मिंगची पद्धत अतिशय प्रभावी आहे कारण रोबोंची संख्या, अचूकता आणि कोणत्याही धोकादायक स्थितीमध्ये पुढे जाण्याची क्षमता यामुळे शत्रू हतबल होऊ शकतो. शिवाय ही ड्रोन्स तयार करायला तुलनेने खर्च कमी येतो!



तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून लक्ष्य ओळखण्याची क्षमता वाढवणारा एक रशियन आत्मघातकी ड्रोन युक्रेनवरील आक्रमणाच्या प्रतिमांमध्ये दिसला आहे. या ड्रोनचे नाव कुबला असे आहे. हे शस्त्र (ड्रोन) हवेत उडत असताना, वर्ग आणि प्रकारानुसार लक्ष्याचा शोध घेते. १.२ मीटरच्या पंखांसह, पांढराशुभ्र ड्रोन लहान पायलटलेस फायटर जेटसारखा दिसतो. हे पोर्टेबल लॉन्चमधून उडवले जाते, ते ३० मिनिटांसाठी १३० किलोमीटर प्रति तासापर्यंत वेगाने प्रवास करू शकते आणि तीन किलो स्फोटकांचा स्फोट करून जाणूनबुजून लक्ष्यावर कोसळते. रिमोट ग्राउंड टार्गेट्स नष्ट करण्यासाठी डिझाइन केलेले हे ड्रोन मार्गदर्शन प्रणालीमधून मानवाने किंवा प्रतिमेमध्ये निश्चित केलेल्या लक्ष्याच्या निर्देशांकांवर मारा करते. स्वायत्त शस्त्रास्त्रांच्या बाबतीत, रशियाने बॉम्ब निकामी करण्यापासून विमानविरोधी आणि अर्थातच हत्या करण्यापर्यंतच्या कामांसाठी मानवरहित शस्त्रे आणि वाहने विकसित केली आहेत. फक्त हवाई नाही तर हे तंत्र समुद्रात पाण्याखालीही कामी येते. महासागरांमध्ये, मानवविरहित नौदल आणि समुद्राखालील वाहनांमध्ये एआयचा समावेश करण्याची योजना आहे. गेल्या नोव्हेंबरमध्ये रशियन संरक्षण मंत्रालयाने जमिनीवरील लक्ष्यांवर, शत्रूच्या जहाजांवर हल्ला करण्यासाठी आणि 'गुप्त मोहिम' पार पाडणाऱ्या विशेष दलाच्या सैनिकांना मदत करण्यासाठी 'कामिकाझे ड्रोन'ने नौदलाच्या जहाजांना सशस्त्र केले होते. कृत्रिम बुद्धिमत्ता ही दुधारी तलवार आहे, याची जाणीव हळूहळू होऊ लागली आहे.

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

✦✦✦

## भारतीय न्यायव्यवस्थेला न्याय कोण देणार?



परवाच्या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानंतर सर्वच जनतेतील घटकांच्या मध्ये, मुंबई बॉम्ब स्फोटाच्या बारा आरोपींना निर्दोष सोडल्यामुळे चर्चांना उत आलेला आहे.

यातील बरेच मंडळी न्यायालयाच्या निकालावर नाखुश असल्याचे दिसून आले. तर काही जणांनी या खटल्याच्या, मा. सर्वोच्च न्यायालयाकडून मिळणाऱ्या अंतिम निकालाला आणखी कितीकाळ वाट बघावी लागेल या बद्दल शंका व्यक्त केल्या.

एकूण एखादा खटला सुरू झाल्यापासून किती कालमर्यादेत संपवावा या साठी काही बंधन आहे की नाही? असा प्रश्न मनात उभा ठाकतो. तब्बल एकोणीस वर्षांनी मा. उच्चन्यायालयाचा निकाल लागला. असे का व्हावे?

याला केवळ न्यायासनाला नावे ठेऊन काहीही साध्य होणारे नाही. चित्रपटात देखील या समस्येवर प्रसंग चित्रित झालेला आहे. त्यातील अभिनेत्याने तारीख पे तारीख, तारीख पे तारीख! असे म्हणत लोकप्रियता मिळविली. पण उपाय सांगितला नाही.

याकरिता औद्योगिक क्षेत्रात ह्यउत्पादित वस्तुह्ल मधील त्रुटी शोधण्यासाठी वापरल्या जाणारी आणि परिणामकारक अशी मूल कारण मीमांसा (ROOT COUSE ANALYSIS) ही पद्धती अवलंबविणे आवश्यक आहे. याकरता सुरवातीसच एक उद्दीष्ट स्पष्टपणे मान्य केले जाते. ते म्हणजे ही दोष शोधण्यासाठी असून दोषी शोधण्यासाठी नाही. (FACT FINDIND NOT FAULT FINDING), त्यानंतर सर्व संबंधित व्यक्ती कारण मीमांसा करीत मुळापर्यंत जातात. त्यामध्ये कोणाचा मान अपमान, जेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव व दावे अमान्य असतात.

आपण अश्या तऱ्हेने विचार केला तर आपणास लक्ष्यात येते की, अगदी तालुका किंवा शहर न्यायालयापासून ते सर्वोच्च न्यायलयापर्यंत सर्वच न्यायालये ही खटल्यांच्या अतीव ओज्या खाली दबलेली आहेत. असे का? आपल्या देशातील लोक इतके संख्येने आपसात भांडणारे आहेत का? की इतके संख्येने गुन्हेगार आहेत? तर आपणच कसे म्हणतो की भारतीय जनता ही सहनशील, शांतताप्रिय आहे वगैरे वगैरे! मग?

यातील पहिले कारण म्हणजे आपली अफाट लोकसंख्या. दुसरे कारण म्हणजे सामाजिक रीत्या, वस्ती अथवा गाव स्तरावर वादविवाद सोडविणारी यंत्रणाच नष्ट झाल्या सारखी आहे. जुन्याकाळी अश्या वेळी पंचांच्या मार्फतच बव्हंशी निवाडा होत असे. त्यावर अपवाद वगळता अपीलच नसे.

या कनिष्ठ स्तरावरील जर एखाद्या निवाड्या बद्दल जर पंचांच्या मध्येच जर एकमताने निवाडा दिल्या गेला नसेल तरच वरिष्ठ स्तरावर जाण्याचा अधिकार असे. आता फक्त बोलण्यातच पंचायतीराज आहे. आपली ग्रामपंचायत असो, की तालुका पंचायत असो, त्यांचे काम फक्त प्रशासकीयच होतांना दिसते.

उदाहरणार्थ गावातील रस्त्याचे काम निकृष्ट झाले की नाही ह्यासाठी देखील लोकांना न्यायालयाची पायरी चढावी लागते. तेथे तारखांवर तारखा आणि सुनावणीस लागणारा वेळ धरून इतका काळ जातो की तोपर्यंत तो रस्ता होता की नव्हता अश्या अवस्थेत गेलेला असतो.



● डॉ. अविनाश प. परांजपे
वानाडोंगरी, हिंगणारोड,
नागपूर.

खरेतर गावातील एखादा सामान्य पणे सर्वमान्य सक्षम अधिकारी, शिक्षक, प्रतिष्ठित व्यक्ती किंवा तेथील त्या वेळेस उपस्थित रस्ता वापरणारे लोक यांच्या तेथेच घेतलेल्या निर्णयास तत्काल रस्ता पुन्हा नीट बांधण्यात यावा यास अंतिम मानले गेले पाहिजे. नो अपील..!

पण तसे होत नाही. कोणीतरी कोर्टात गेल्याशिवाय व वरिष्ठ न्यायालयाचा हुकूम येई पर्यंत तो रास्ता तसाच राहणार.

रस्त्याचा ठेकेदार, त्याला कंत्राट कोणी दिले, तो देण्याचा अधिकार देणाऱ्याला होता की नव्हता, त्याने मध्येच कमिशन खाल्ले की नाही खाल्ले, मटेरियल कोठून आणले? त्याची गुणवत्ता काय हवी होती? ती नीट तपासल्यागेली की नाही? तपासणारा त्यातील तज्ञ होता की नव्हता? असला तरी त्याने ही मध्येच कमिशन खाल्ले की नाही खाल्ले? तज्ञ कंत्राटी होता की शासकीय कर्मचारी? त्याचा अनुभव किती? किती मजूर लावले ? त्यांना योग्य वेतन दिले की नाही दिले? यातील किती मंडळी कोणत्या जाती जमातीची होती? एक ना अनेक घोळ घालणारे प्रश्न उपस्थित करत त्याच्या पुराव्यांच्या मागे माथेफोड करत कधीतरी काहीतरी निकाल लागतो.

लगेच पुढची पार्टी वरीष्ठ न्यायालयात अपिलात जाते. असेच सुरू राहते. जी गोष्ट त्याच ठिकाणी तेथील योग्य व सक्षम व्यक्तींच्या तत्काळ निर्णयाने वाद सुटला असता तो चिघळतो. आणि न्याय व्यवस्थे वरील ताण वाढवतो.

दुसरे एक ऐकलेले उदाहरण. एका बिचाऱ्या युवा इंजीनियरने नोकरी लागल्यावर एका वर्षाने बँकेचे कर्ज काढून एक मोटरसायकल विकत घेतली. अजून गाडी चालविण्याची सवय झाली नसल्याने तो पंधरा दिवस कंपनीच्या बसनेच ड्युटीवर जाणे येणे करत होता. नेमके पंधराव्या दिवशी तो सेकंड शिफ्ट आटोपून रात्री साडेबाराला घरी आला.

घरापासून काही मीटर दूर असतानाच त्याने बघितले की एक चोरटा हळूच त्याची मोटरसायकल घराच्या फाटका बाहेर ढकलत चोरून नेत होता. त्या इंजींनियरने आरडा ओरडा करत त्या चोराला पकडले, परिसरातील नागरिकांनी धाव घेऊन त्या चोराला चोप देऊन पोलिसांच्या स्वाधीन केले. हीच मोठी चूक झाली.

पोलिसांनी पंचनामा करून मुद्देमाल म्हणून ती मोटरसायकल नेऊन पोलिस ठाण्यात लावली आणि चोराला पकडून घेऊन गेले. चोर दोनच दिवसात जामीनावर सुटला. गेली नऊ वर्षे ती मोटरसायकल पोलिस ठाण्यात पडून पडून सडली आणि केसची प्रथम सुनवाई नंतर अजून दुसरी पण सुनवाई झालेली नाही.

त्या चोराचे काय झाले माहिती नाही पण तो बिचारा इंजीनियर जवळ नसलेल्या मोटरसायकलचे बँकेचे कर्ज हफ्ते, सॅलरी लोन कटींग योजनेद्वारे अजून भरतोच आहे, भरतोच आहे, रडक्या तोंडाने.

अजून ह्याच केसचे भवितव्य अंधारात आहे, आणि वकील साहेब म्हणताहेत, तू शासनावर नुकसान भरपाईची केस टाकू शकतोस.

असे का होतेय? अतिश्रीमंत, राजकारणी, अश्या लोकांचे खटले कसे लवकर सुटतात ? आता अशी वेळ आलेली आहे की एका विशिष्ट कालावधीत प्रत्येक खटल्याचा निकाल लागलाच पाहिजे असा कायदा केला गेलाच पाहिजे.

दोन्ही बाजूंच्या वकील मंडळींना फक्त आणि जास्तीत जास्त तीन वेळाच पुढील तारीख देण्यात येईल असा किंवा या प्रकारचा कायदा केला गेला पाहिजे. या बद्दल एका मराठी सिनेमात वकील मंडळींवर टोमणा मारला आहे. त्यात एक नावाजलेला वकील, अश्या आशयाचं म्हणतो की, माझेही वडील नामांकित वकील होते. मी वकील झाल्यावर पहिल्याच सुनावणीत केस जिंकली; तेव्हा ते म्हणाले, तू मूर्ख आहेस. तू ही केस अजून पंचवीस वर्षे लढला असतास तर तुझ्या मुलालाही वकील बनविण्याचा खर्च काढला असतास !

पण यावर कोणत्याही वकील व्यक्तीने आक्षेप नोंदविला नाही. म्हणजे ह्यात तथ्य असेल. केवळ कनिष्ठ न्यायाधीश यांना ज्या निकालात काही संदेह असू शकतो असे गट फिलिंग असेल किंवा दोन न्यायाधीशांत मतभिन्नता असेल केवळ त्याच केसेस ना अपिलाची परवानगी देण्यात यावी. असले ठोस कायदे व्हावेत. केवळ न्यायालयांची आणि न्यायाधीशांची संख्या वाढवून कितीसा फायदा होणार?

अन्यथा वाढत्या लोकसंख्येमुळे आपली न्यायप्रणाली आवाक्याबाहेर गेल्यास, जनतेच्या मनात न्याय देवतेवरील असलेला विश्वास कमी कमी होत होत नष्ट झाल्यास अराजक निर्माण होऊ शकते. पण आपल्या भारतीय न्यायव्यवस्थेला न्याय कोण देणार?

## चाणक्य नीतिकडून व्यवस्थापनाचे धडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : 2020

चाणक्य नीतीचा नवीन शैक्षणिक धोरणात समावेश केलेला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये चाणक्य नीती आपल्याला व्यवस्थापनातील अनेक मौल्यवान धडे शिकवते. व्यवस्थापनातील धड्यांमध्ये प्रभावी नेतृत्व, कर्मचाऱ्यांशी संवाद साधणे आणि कार्यक्षमतेसाठी नियोजन अशा अनेक मूलभूत गोष्टींचा समावेश आहे.

चाणक्य नीतीतील व्यवस्थापनाचे महत्त्वाचे धडे म्हणजे नेतृत्वगुण. चाणक्यानुसार एक चांगला नेता आपल्या लोकांची काळजी घेऊन त्यांच्या गरजांना प्राधान्य देतो आणि लोकांच्या कल्याणासाठी कार्य करतो. धोरणात्मक नियोजनात चाणक्यने राज्याच्या विकासासाठी आणि संरक्षणासाठी योजना आखल्या. याचा अर्थ व्यवस्थापकांनी लोकांच्या कार्यक्षमतेसाठी आणि विकासासाठी योजना आखल्या पाहिजेत.

कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन करतांना चाणक्यने कर्मचाऱ्यांमध्ये प्रेरणा आणि निष्ठा वाढवण्यासाठी बक्षिसे आणि शिक्षेचा वापर केला.

जोखीम व्यवस्थापनात चाणक्यने धोक्यांची जाणीव ठेवून, त्यावर मात करण्यासाठी योजना आखल्या. प्रभावी संवाद आणि विश्वास वाढवणे, तसेच परस्पर फायदेशीर उपाय शोधणे, हे व्यवस्थापनात महत्त्वाचे आहे.

जबाबदारी पार पाडताना नियमित नोंदींचे पद्धतशीर आणि अचूक पडताळणी आणि कर्मचाऱ्यांकडून कामाची जबाबदारी घेणे व्यवस्थापनात होते. त्याबरोबरच संघटनेतील व्यक्तींचे हित जपताना चाणक्यच्या मते, लोकांचे हित हेच संघटनेचे हित आहे.



डॉ. जयश्री पंढरीनाथ जाधव - कदम
9881938858

चाणक्यने नियोजन आणि अंमलबजावणीसाठी धोरणे तयार केली आणि ती प्रभावीपणे राबवली. चाणक्यने परिस्थितीचा अभ्यास करून योग्य निर्णय घेतले. नैतिकता जपण्यात चाणक्यने नेहमी नैतिक मार्गाचा अवलंब केला, जो व्यवस्थापनात महत्त्वाचा आहे.

स्वावलंबन चाणक्यचा असा विश्वास होता की इतरांवर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःवर अवलंबून राहावे. यामुळे निराशा टाळता येते आणि अधिक परिपूर्ण जीवन जगता येते. चाणक्यची यशाची तत्वे आधुनिक काळातही प्रासंगिक आहेत.

स्पष्ट ध्येये निश्चित करून, आत्म-शिस्तीचा सराव करून, भूतकाळातील चुकांमधून शिकून, मजबूत नातेसंबंध निर्माण करून, लवचिक आणि जुळवून घेणारे बनून, कठोर परिश्रम करून आणि सकारात्मक दृष्टिकोन राखून, जीवनाच्या विविध पैलूंमध्ये यश मिळवता येते. चाणक्य नीतीने समाजकारणाला विकासाची दिशा दिली.

नवीन शैक्षणिक धोरणाने चाणक्य नीतीचे भूतकाळातील ज्ञान वर्तमानकाळात नव्याने जिवंत केले आहे. चाणक्य यांचे ज्ञान अर्थशास्त्र किंवा एखाद्या प्रसारमाध्यमातून कधीतरी उल्लेख केला जात होता. चाणक्य नीतीवर आजपर्यंत पाहिजे त्या प्रमाणात समाजासमोर, युवा पिढीसमोर विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवलेला नाही, आपल्यासाठी ही खेदाची बाब होती. म्हणूनच नवीन शैक्षणिक धोरणाने चाणक्य नीतीचा अभ्यासक्रमात समावेश करून समाज विकासाला दिशा देण्याचे महत्त्वापूर्ण कार्य केले आहे.

आज भरकटत चाललेल्या समाजाला कुठेतरी सामंजस्यातून, तत्ववादाचा, नीतीमत्तेचा, वैचारिक विचारांचा व्यक्ती घडविणे आवश्यक आहे. महत्त्वाचे चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व असणाऱ्या व्यक्तीचा समाज हवा आहे. समाजात वावरताना समाज विकसित होत आहे असेच दिसले पाहिजे तेव्हाच चांगल्या व्यक्तिमत्त्वाचे हनन होणार नाही.

आज नीती भ्रष्ट विचारांचा वर्ग समाजात पुढार पणाने वावरताना दिसत आहे. त्यात नवीन सुसंस्कृत भावी पिढी घडवणारा एखादा नालायक महाभाग शिक्षण क्षेत्रात असेल तर देशाचे अन त्या पिढीचे बाराच वाजतात. एखाद दुसऱ्या चुकीच्या व्यक्तीमुळे शिक्षणासारखे क्षेत्र जेव्हा कलंकित होते तेव्हा व्यक्तीला चाणक्य नीतीच्या विचारांची खरी गरज असते.

चाणक्य नीतीच्या ज्ञानाने जणू चुकलेल्या एखाद दुसऱ्या महाभागाच्या डोक्यात प्रकाश पडलाच तर देव पावला! चाणक्य नीती खऱ्या अर्थाने नवीन शैक्षणिक धोरणातून का आणली या प्रश्नाचे उत्तर जाणकारांना कळाले आहे.

दुसरे महत्त्वाचे म्हणजे आजही युवा पिढीला संस्कारक्षम बनवणे हे आई-वडिलां इतकेच शिक्षकाचेही कर्तव्य आहे. चाणक्य नीतीचे ज्ञान प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे.

थोर पुरुषांचे व्यक्तिमत्व, आचार- विचार कार्यक्षमता, त्यांच्याकडील असलेला दूरदृष्टीपणा, समाज विकासाची त्यांच्या अंगी असलेली कास, समाज परिवर्तनासाठी त्यांचे कार्य आणि त्यावेळी बदललेला समाज आपल्या साठी तो भूतकाळ इतिहास आहे. आज पुन्हा त्याच थोर पुरुषांच्या वैचारिक गुणवत्तेचा विचार बदल घडवून आणणार.

इतिहासात देशाच्या विकासासाठी राजसत्ताक प्रशासन होते. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करताना खंबीर नेतृत्वाची गरज असते. चाणक्यांच्या कालखंडात राज्यकारभारासाठी राजदरबारात विविध पदांवर लोकांची नेमणूक केली जात असे. त्यामध्ये आर्थिक व्यवहार, प्रजेचं हित जपणारा व्यक्ती निवडताना त्यांच्या अंगी असलेले गुण तपासले जात होते. त्यामध्ये व्यक्तीची बुद्धिमत्ता, कामाप्रतिम निष्ठावान असावा, नेतृत्व कौशल्य असावे कारण आपल्या हाताखाली असंख्य कर्मचाऱ्यांना तो आपल्या नेतृत्वाचे गुण दाखवणारा असतो. आपल्या कर्मचाऱ्यांवर हुकुमशहा करणारा नसावा. सर्वात महत्त्वाचे चारित्र्यसंपन्न असावा.

पूर्वीचा राजा युद्धावर जात असे अशावेळी राजमहलाचे व्यवस्थापन आणि राजमहालातील स्त्रियांची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची होती. वचनाला जागणारी प्रजा कुठेही गैरप्रकार करत नसे. राज्यातील मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था त्यांच्यासाठी असलेले गुरुचे स्थान राजदरबारी असणारे विविध पदावरील प्रमुख हे अत्यंत व्यवस्थापन चोख पद्धतीने करत असे.

आदर्शवत अनेक थोर महापुरुषांनी आपल्या कर्तृत्वाने, बुद्धीच्या जोरावर, नेतृत्व कौशल्याने, चारित्र्यसंपन्नतेने समाज विकसित करण्यात आयुष्य घालवलेले आहे, आज अशाच व्यक्तिमत्त्वाची देशाला, समाजाला गरज आहे. समाज विघातक कृत्य आणि समाज संकटात टाकणाऱ्या लोकांकडे जर व्यवस्थापन दिले तर समाजाचा विकास हा कधीही होणार नाही.

चाणक्यकडून काय शिकावे? तर जीवनात यशस्वी होण्यासाठी चाणक्याचे १० आवश्यक गुण आहेत, त्यात दूरदर्शीपणा,रणनीतिकार, बुद्धिमान, धाडसी, शिस्तबद्ध, नैतिकता, अनुकूलनीय, चिकाटी, धोरणात्मक विचारवंत, नम्रभाव जीवनाच्या कोणत्याही पैलूवर असे गुण लागू केले जाऊ शकतात.

यशस्वी होण्यासाठी आपल्याकडे स्पष्ट दृष्टी असणे आवश्यक आहे, एक चांगला रणनीतीकार असणे आवश्यक आहे, बुद्धिमान, धाडसी, शिस्तबद्ध, नैतिक, जुळवून घेणारे, चिकाटीचे असणे आवश्यक आहे. प्राचीन भारतीय ज्ञानाच्या विशाल संग्रहात, जीवन आणि व्यवसायासाठी धोरणात्मक विचार आणि व्यावहारिक सल्ल्याचे दीपस्तंभ म्हणून चाणक्य ई.स.पूर्व ४ थ्या शतकात भारतीय मॅकियावेली म्हणून ओळखले जाणारे, एक प्रसिद्ध तत्वज्ञानी, अर्थशास्त्रज्ञ आणि राजेशाही सल्लागार होते.

प्राचीन तक्षशिला शहरात जन्मलेले चाणक्य त्यांच्या काळातील एक खरे पुनर्जागरण पुरुष, एक हुशार रणनीतिकार, राज्यशास्त्राचे तज्ज्ञ आणि कुशल अर्थशास्त्रज्ञ होते. आदरणीय बुद्धिमत्ता आणि हुशारीने त्यांना कौटिल्य, म्हणजेच चतुरतेचा स्वामी असेही म्हटले जात असे.

चाणक्य यांचे जीवन प्राचीन भारतातील सर्वात मोठ्या आणि प्रभावशाली साम्राज्यांपैकी एक असलेल्या मौर्य साम्राज्याच्या उदयाशी जोडले गेले होते. चंद्रगुप्त केवळ १९ वर्षांचा असताना चंद्रगुप्त मौर्य यांना सिंहासनावर बसवण्यात आणि साम्राज्य स्थापन करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

चाणक्य यांचे धोरणात्मक मार्गदर्शन आणि राजकीय बुद्धिमत्ता साम्राज्याच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावत होती हाच आदर्श विद्यार्थ्यांना देणे गरजेचे आहे.यासाठीच नवीन शैक्षणिक धोरणात उत्कृष्ट व्यवस्थापनासाठी चाणक्य नीतीचा स्वीकार विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हाच मूळ उद्देश आहे.

## मतदार यादीच्या नावाखाली नागरिकत्वाची चौकशी?

बिहारमध्ये मतदार यादीवरून झालेल्या गोंधळानंतर चंद्राबाबू नायडू यांनी आंध्र प्रदेश व इतर राज्यांत निवडणुकीपूर्वी पडताळणी प्रक्रिया वैज्ञानिक पद्धतीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे. दुसरीकडे हिमंता बिस्वा सर्मा यांनी एनआरसीचा मुद्दा उपस्थित करून संवैधानिक प्रकरणात राजकीय गुंतागुंत वाढवली आहे. पश्चिमेकडे नागरिकत्वाचे कठोर नियम आहेत, परंतु भारतात नागरिकत्वाचा मुद्दा संसदीय अपयश, सत्तेचे राजकारण व प्रशासकीय भ्रष्टाचाराला बळी पडत आहे. नागरिकत्वाशी संबंधित ६ मुद्द्यांवर सर्व पक्षीय निरोगी चर्चेची गरज आहे.

-------------------

**१. एनआरसी** : १९५१ च्या जनगणनेनुसार, पहिले राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) तयार करण्यात आले होते, परंतु त्यानंतर ते अपडेट करता आले नाही. नागरिकत्व कायद्यानुसार, २००३ मध्ये एनआरसीमध्ये सुधारणा लागू करण्याची मोहीम सर्वोच्च न्यायालयाने २०१९ मध्ये स्थगित केली होती. आसाम करार लागू करण्यासाठी नागरिकत्व कायद्यात जोडण्यात आलेले कलम ६-अ गेल्या वर्षी सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने वैध जाहीर केले होते.

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला बिहारमधील निवडणुकीपूर्वी मतदार यादी पडताळणीचा सल्ला दिला, पण नागरिकत्वाशी संबंधित अनेक प्रलंबित प्रकरणांची सुनावणी करण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात अनेक वर्षांपासून घटनापीठ स्थापन केलेले नाही.

देशभरात मतदार यादीची पडताळणी झाली तर लोकशाही शुद्ध होईलच, शिवाय नागरिकत्वाच्या कागदपत्रांचा गुंतागुंतीचा प्रश्नही सुटू शकेल. ही निवडणूक आयोगाची संवैधानिक जबाबदारी आहे.

**२. एनपीआर** : लोकसंख्या कायदा १९४८ मध्ये बनवण्यात आला होता, परंतु राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (एनपीआर) साठी नियम २००३ मध्ये बनवण्यात आले होते. त्यानुसार, भारतातील सर्व सामान्य रहिवाशांसाठी एनपीआरमध्ये नोंदणी अनिवार्य आहे. २०१० मध्ये पहिले एनपीआर तयार झाल्यानंतर पाच वर्षांनी ते अपडेट करण्यात आले. परंतु, आधार कार्डप्रमाणे एनपीआरमध्ये तपशील असणे हा नागरिकत्वाचा अधिकृत पुरावा नाही.

**३. सीएए** : नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) डिसेंबर २०१९ मध्ये मंजूर करण्यात आला. त्यानुसार, पाकिस्तान, अफगाणिस्तान व बांगलादेशातील गैर-मुस्लिम धार्मिक अल्पसंख्याक निर्वासितांना भारतीय नागरिकत्व मिळू शकते.

त्या कायद्यानुसार, निर्वासितांना नागरिकत्व मिळवण्यासाठी भारतातील निवासाचा पुरावा म्हणून २० प्रकारच्या कागदपत्रांपैकी एक आणि शेजारील देशात निवासाचा पुरावा म्हणून ९ कागदपत्रांपैकी एक कागदपत्रे सादर करावी लागतात. सीएए व रोहिंग्या निर्वासितांसारखे खटले वर्षानुवर्षे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. त्यामुळे मतदार यादीत ओळख असूनही परदेशी लोकांना देशाबाहेर काढण्यासाठी गृह



मंत्रालयाला कारवाई करावी लागेल.

**४. आधार** : सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट २०१५ मध्ये म्हटले होते की, भारत सरकारने माध्यमांत मोठ्या प्रमाणात प्रचार करावा की, आधार कार्ड आवश्यक नाही, परंतु अनेक आदेश आणि न्यायालयाच्या अंतिम निर्णयाला झुगारून सरकारने मागच्या दाराने आधार अनिवार्य केले.

सध्या बिहारमध्ये आधारला मान्यता देण्याची मागणी करणारे पक्ष मतदार कार्ड आधारशी जोडण्यास विरोध करत आहेत. दोन वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, फॉर्म-६ बीसाठी आधार आवश्यक नाही.

असे असूनही निवडणूक आयोगाने ६६.२३ कोटी मतदारांचे आधार क्रमांक गोळा केले आहेत. दीर्घ झोपेतून जागे झाल्यावर सरकारने कडक कारवाई वाढवली आहे. परंतु खासगी संस्थांनी पडताळणीशिवाय जारी केलेले कोट्यवधी आधार क्रमांक आता सरकारसह निवडणूक आयोगासाठी वादाचे कारण बनले आहेत.

**५. नागरिकत्व** : सर्वोच्च न्यायालयाच्या जुन्या निर्णयानुसार, निवडणूक आयोग मतदार यादीच्या बहाण्याने नागरिकत्वाची चौकशी करू शकत नाही. एनआरसी आणि नागरिकत्वाचा विषय केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत येतो.

परंतु, कलम-३२६ नुसार, १८ वर्षांवरील नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याबाबत निवडणूक आयोगाला संविधानाकडून पूर्ण अधिकार आहेत. म्हणूनच आधार आणि ड्रायव्हिंग लायसन्सला मान्यता असूनही बनावट रेशनकार्ड ओळखणे कठीण आहे.

**६. मतदार यादी** : बिहारमध्ये १% मतांच्या बदलामुळे सरकारची गणना बदलली होती. त्यामुळे भ्रष्ट मार्गांनी मतदार यादीत चुकीची नावे समाविष्ट करणे किंवा योग्य मतदारांची नावे काढून टाकणे दोन्ही चुकीचे आहेत.

राज्य सरकारांच्या स्थानिक प्रशासनातील मनमानी व भ्रष्टाचारावर कडक नियंत्रण ठेवून आयोग आपली विश्वासार्हता वाढवू शकतो. मतदार यादी स्वतंत्र, पारदर्शक व निःपक्षपाती पद्धतीने दुरुस्त करणे ही आयोगाची घटनात्मक जबाबदारी आहे.

■ ■ ■

## मुंबई लोकल

■ शिवाजी देशमुख
हदगाव, जि. नांदेड.
माजी विद्यार्थी, शाविनि
चिखलदरा. (१९६७- ७४)

माझे विद्यानिकेतनीय वर्गमित्र पद्माकर राऊत (बॅच १९६७-१९७४ शाविनी चिखलदरा) व सौ साधनाताई राऊत यांचे एकुलते एक कन्यारत्न म्हणजे आर्किटेक्चर प्राची राऊत. पद्माकर राऊत हे पंजाब नॅशनल अधिकारी पंजाब नॅशनल बँक यवतमाळ येथून अधिकारी पदावरून सेवानिवृत्त होऊन होऊन नारंगी नगर यवतमाळ येथे वास्तव्यास आहेत.

यवतमाळ सारख्या छोट्याशा शहरातून आलेली प्राची राऊत आज मराठी चित्रपट सृष्टी स्वतःच वेगळं स्थान निर्माण करीत आहे. आर्किटेक म्हणून शिक्षण घेतलेली प्राची २०२५ मध्ये मुंबईत आर्ट डायरेक्टर म्हणून काम करायला आली आणि आज ती आपल्या पहिल्या मराठी चित्रपटाची निर्माती आहे. मुंबई लोकल या सिनेमाचा ट्रेलर २२ जुलै रोजी प्रदर्शित झाला असून १ ऑगस्ट २०२५ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. मुंबई लोकल ही प्राचीचे सिने विश्वातले पहिले पाऊल आहे. प्राची राऊत ही शासकीय विद्यानिकेतन परिवाराची कन्या आहे, तिचे कौतुक करणे अपना सर्व जीपीएस परिवाराचे कर्तव्य आहे.

प्रत्येक जीपीएस परिवाराने आणि सर्वांनी आवर्जून एकदा आज हा सिनेमा थेटर मध्ये जाऊन नक्की पहावा. विद्यानिकेतन परिवाराचा पाठिंबा आणि सर्वांचे प्रेम हाच खरा सिने पुरस्कार रुपी तिला आशीर्वाद आहे. यवतमाळच्या एका साध्या घरातून सुरू झालेला हा प्रवास आता मराठी चित्रपट सृष्टीत नवे ध्येय गाठायला सज्ज झाला आहे.

प्राची राऊत आणि त्यांच्या टीमला मुंबई लोकलसाठी विद्यानिकेतन परिवाराच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा आपली विद्यानिकेतन्य कन्या प्राची राऊत चा मुंबई लोकल चित्रपट बघून जरूर जरूर कौतुक करायला हवे. ही जीपीएस परिवारासाठी अभिमानास्पद बाब असेल.

**उद्धवरावा स्वयं आत्मा...**

■ ■




## मंगळागौर

श्रावण महिना सुरू झाला की सण आणि व्रत-वैकल्याची रेलचल सुरू होते .या काळात धरती पण हिरव्या रंगाची शाल लेवून आनंदाने डोलत असते.

अशा या श्रावणात येणारी मंगळागौर नवविवाहिता पुजतात. श्रावण महिन्यातल्या दर मंगळवारी मंगळागौर पूजन केले जाते. हे सौभाग्याचे व्रत आहे. शंकर-पार्वती ही या व्रताची देवता. शंकर-पार्वती हे प्रेम, समर्पण आणि निष्ठा यांचे प्रतीक आहे. या दिवशी गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली नवविवाहित दांपत्य किंवा पाच नवविवाहिता एकत्र येऊन उमा शंकराची पंचोपचार पूजा करून, बेल, दुर्वा पत्री १६ च्या संख्येत महादेवाला वाहतात. या पत्रींना आध्यात्मिक आणि आयुर्वेदिक महत्व आहे. लग्नानंतर पाच वर्ष हे व्रत करून नंतर त्याचे उद्यापन करायचे असते. पूर्वी सकाळी पूजा झाल्यानंतर संध्याकाळी सवाष्णींना हळदीकुंकवाला बोलवले जाई, त्यानंतर रात्री मंगळागौर मैत्रिणींसह जागवीत असे. त्यात विविध प्रकारचे पारंपरिक खेळ स्त्रिया खेळत असे, तसेच गाणी गाइली जायची . फुगडी, आट्यापाट्या, पिंगा, झिम्मा अश्या विविध खेळातून शारीरिक व्यायाम सुद्धा आपसूकच व्हायचा. एकंदर काय तर संपूर्ण दिवस आणि रात्र निसर्गासमवेत आणि मैत्रिणी सोबत आनंदात घालवण्यात येई.

अशा सणाव्रतांच्या निमित्ताने स्त्रियांना आपला आनंद, भावना, संवेदना व्यक्त करण्यासाठी हे दालन. लग्नानंतर येणाऱ्या पहिल्या वर्षी मंगळागौर पूजन उत्साहात केले जाते. मंगळागौर हे मांगल्य, पावित्र्य आणि सुचिता यांचा संगम आहे. मंगळागौरीचा हा सण आजही अशा प्रकारच्या उत्साहात आपल्याला पाहायला मिळतो. पण काळानुरूप त्याचे स्वरूप मात्र बदललेले आहे.

हल्ली मोठमोठे कार्यालय घेऊन, सासर- माहेरची मिळून एकच मंगळागौर मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. जणू काही छोटेखानी लग्नच असल्याचा भास होतो. हल्लीच्या पिढीला स्वातंत्र्याची वाणवा नाही. त्यामुळे पूर्वीच्या त्या खेळांची, भावभावनांची, आनंदाची अनुभूती या पिढीला येईलच असे नाही. जे खेळ पूर्वीच्या नवविवाहिता मैत्रिणींसोबत खेळत असे, त्या आताच्या नवविवाहिता, स्त्रिया खेळत नाही. मात्र मंगळागौरीचे खेळ खेळणाऱ्या मंडळांना बोलावून आपल्या मनाची हौस मात्र भागवतात. आत्ताच्या मुली आपल्या नोकऱ्या सांभाळून मंगळागौर व्रत करतात हेही नसे थोडके. या नव्या झगमगाटात मंगळागौर पूजनातील भाव-भक्ती कायम ठेवली पाहिजे इतकेच सांगणे आहे.

■ सौ. माधवी पत्की
नागपूर.

■ ■ ■

महासागर
■ रविवार ■
■ दि. ३ ऑगस्ट २०२५



# क्राईम

# दिशा भटकली... राजाबाबूसोबत लटकली..

पतीवर आलेल्या संकटात पत्नी खंबीरपणे त्याच्या पाठीशी उभी राहते. हजारो उदाहरणातून हे सिद्ध करता येते. परंतु, एखादी महिला दिशा भटकत असेल तर त्या कुटुंबाची वाताहत होण्यास वेळ लागत नाही. या प्रकरणातही ती अशीच दिशा भटकली आणि एका हसत्या खेळत्या कुटुंबाची अक्षरशः राखरांगोळी झाली. अर्धांगवायू झालेला तिचा पती जीवाने गेला, ती कोठडीत गेली आणि तीन मुलांच्या नशिबी वर अनाथांचे जीणे आले.

चंद्रसेन बाळकृष्ण रामटेके (३८) आणि पत्नी दिशा चंद्रसेन रामटेके (३०), त्यांच्या दोन मुली आणि एक मुलगा एवढेच काय ते पाच जणांचे कुटुंब. नागपूरच्या वाठोडा पो. स्टे. अंतर्गत तरोडी (खु.) येथील साईनाथ सोसायटीत हे कुटूंब राहायचे.

एका ट्रॅव्हल्स कंपनीत व्यवस्थापक म्हणून कामाला असलेल्या चंद्रसेनच्या संसाराचा गाडा सुरळीत सुरू असतानाच साधारणतः दीड वर्षांपूर्वी त्याला अर्धांगवायूचा झटका आला. हात पाय लुळे पडल्याने तो कामावर जावू शकत नव्हता आणि घरीच रहात असे. चंद्रसेनला अर्धांगवायूचा झटका आल्यानंतर या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा ठाकला.

दिशाने पदर खोचला आणि ती कार चालवायला शिकली. त्यातून ती प्रवाशाची ने आण करीत असे. परंतु, कधी कधी बाहेरगावी जावे लागत असल्याने तिने कार चालविणे सोडून दिले. त्यानंतर स्वतःचे दागीने तोडून तिने घरीच पाण्याचा व्यवसाय सुरू केला. विविध कार्यक्रमात ती पाण्याच्या कॅनचा पुरवठा करीत असे.

दरम्यान, दिशाच्या घराजवळच आरोपी राजा याचे टायरचे दुकान होते. येता जाता त्यांची नजरानजर होत होती. त्यातच त्यांचे सूत जुळले. पुढे त्यांच्यात विवाहबाह्य संबंध प्रस्थापित झाले. ही माहिती चंद्रसेनला समजताच तो संतापला. नंतर तो तिला वारंवार शिवीगाळ करीत असे. रोजच्या शिवीगाळीला दिशा कंटाळली होती. ही माहिती दिशाने राजाला दिली होती. त्यानंतर दोघांनीही चंद्रसेनचा काटा काढण्याचे ठरविले.

शुक्रवार ४ जुलै रोजीची ती दुपार. तीनच्या सुमारास चंद्रसेन आपल्या घरी झोपला होता. त्यावेळी दिशाने फोन करून राजाला आपल्या घरी बोलावून घेतले. राजाने झोपेत असलेल्या चंद्रसेनच्या तोंडावर उशीने दाबून त्याचा खून केला. त्यानंतर तो आपल्या दुकानात निघून गेला. तीन तासानंतर दिशाने कांगावा करायला सुरुवात केली. त्यामुळे वस्तीतील लोक गोळा झाले.

दिशाने त्याला चारचाकी वाहनातून मेडिकलमध्ये नेले. डॉक्टरांनी चंद्रसेनला तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी वाठोडा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. चंद्रसेनच्या शेजारी राहणारा श्याम आत्राम यांनी ही माहिती चंद्रसेनचा मोठा भाऊ संजय रामटेके यास दिली.

दुसऱ्या दिवशी शवविच्छेदन अहवाल आला असता कुठल्यातरी वस्तूने चंद्रसेनच्या तोंडावर आणि नाकावर दाब दिल्याने त्याचा मृत्यू झाला असे डॉक्टरांनी सांगितले. सहायक निरीक्षक संतोष सपाटे यांनी दिशाची विचारपूस केली असता ती फुटली आणि प्रियकराच्या मदतीने पतीचा खून केल्याची कबुली दिली. याप्रकरणी वाठोडा पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून आरोपी पत्नी दिशा आणि तिचा प्रियकर राजाबाबू या दोघांनाही अटक केली.

पतीचा आधार बनण्याऐवजी विवाहबाह्य संबंधातून त्याच्या जीवावर उठलेल्या या पत्नीने केवळ पतीलाच संपवले नाही तर स्वतःसह आपल्या तीन अपत्यांचेही भविष्य अंधकारमय करून टाकले.

■ ■ ■

# सावत्र आई, ५ लाख.... टीप अन् खेळ खल्लास...

वेळ साधारणतः दुपारी २ सव्वादोनची... ती रस्त्याने पायी निघाली... मुख्य मार्गाच्या कडेला असलेल्या फुटपाथवरून चालत होती... तिला काय ठाऊक की तिच्याजवळ काही क्षणच उरले आहेत म्हणून? कलाकुंज हॉटेलसमोर ती पोहचते न् पोहचते तोच तोंडाला रुमाल बांधून आलेल्या एका व्यक्तीने भररस्त्यात चाकूने गळा चिरून तिची निर्घृण हत्या केली.

सिव्हील लाईन्स सारख्या गजबजलेल्या परिसरात दिवसाढवळ्या ही थरारक घटना घडल्याने पोलिस विभागात खळबळ उडाली. सीताबर्डी पोलिसांसह गुन्हे शाखेची वेगवेगळी पथके घटनास्थळी पोहचले आणि अविलंब तपास सुरु झाला. काही तासांतच पोलिसांनी आरोपीला शोधून काढले.

कोण होती ही महिला? आणि आरोपीने दिवसाढवळ्या तिचा खून का केला? कोण कोण होते या हत्याकांडात सहभागी? पोलिसांच्या तपासात जे समोर आले ते सारे चक्रावणारे होते.

माया मदन पसेरकर (४९) असे या मृत महिलेचे नाव. नागपूर येथील सिव्हील लाईन्स परिसरात जवाहर विद्यार्थी गृहामागे ती राहायची. माया ही मदन पसेरकर (६०) यांची तिसरी पत्नी होती. मदन यांची पहिली पत्नी सोडून गेली, तर दुसरीचे निधन झाले होते. मदनला दुसऱ्या पत्नीपासून दोन मुले आणि गीता नावाची एक मुलगी आहे. पसेरकर कुटुंब हे शासकीय कार्यालयांमध्ये काम करते.

गीता आणि माया या सावत्र मायलेकी. बुधवार २३ जुलै रोजी दुपारी २.१५ वाजताच्या सुमारास माया काम आटोपून पायदळ घरी जात होत्या. या दरम्यान तोंडाला रुमाल बांधून असलेल्या एका व्यक्तीने त्यांचा पाठलाग केला. कलाकुंजसमोर त्याने माया यांच्यावर मागून हल्ला केला. तीक्ष्ण शस्त्राने गळा चिरून फरार झाला. डोळ्यासमोर ही थरारक घटना पाहून रस्त्याने ये-जा करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. माया यांचे घर घटनास्थळापासून जवळच असल्याने कुटुंबीयही तेथे पोहोचले. तोपर्यंत माया यांचा मृत्यू झाला होता.

माहिती मिळताच सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त नित्यानंद झा आणि मोठ्या संख्येत पोलिस घटनास्थळी पोहोचले. मारेकऱ्याचा कोणताही सुगावा नव्हता. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासण्यास सुरूवात केली. एका फुटेजमध्ये तो माया यांचा पाठलाग करताना आणि गुन्हा करून पळताना दिसला. एसीपी अभिजित पाटील यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने कुटुंबीयांची चौकशी सुरू केली.

सखोल चौकशीमध्ये मारेकरी हा पसेरकर यांचा जावईच निघाला. मुस्तफा खान मोहम्मद खान (22) रा. गजानननगर, एमआयडीसी असे आरोपीचे नाव आहे. पण, जावयाने आपल्या सासूसाच गेम का केला? याचे कोडे उलगडण्याचे आव्हान कायम होते. या हत्याकांडाची एकएक कडी पोलीस उलगडत गेले आणि समोर आली एक वेगळीच कहाणी.

मायाची सावत्र मुलगी गीताचे यापूर्वी दोन लग्न झाले होते आणि आरोपी मुस्तफा हा तिसरा पती आहे. मुळचा हरीयाणा येथील रहिवासी मुस्तफा खान याचेशी तिचे अनेक वर्षापासून प्रेमसंबंध होते. ४ वर्षांपूर्वी दोघांनीही प्रेमविवाह केला होता.

गीताची सावत्र आई मायाला मुस्तफाने ५ लाख रुपये उसणे दिले होते. मायाने ही रक्कम परत केली नव्हती. यावरून मुस्तफाचा मायाशी वाद झाला होता.

चौकशीत मुस्तफाने सांगितले की, त्याने मायाला उसणे दिलेले ५ लाख रूपये परत करण्यास माया टाळाटाळ करीत होती. तसेच मुस्तफाशी संबंध तोडण्यासाठी गीतावर दबाव टाकत होती. पैसे परत मागण्यासाठी तो वारंवार मायाकडे जायचा. मात्र, जी नकार द्यायची. यातूनच मुस्तफाने तिला ठार मारण्याचा निश्चय केला. त्याने डी-मार्टमधून चाकू खरेदी करूण आणला होता. घरून निघाल्यापासून तो मायाचा पाठलाग करीत होता. तिला एकटे गाठून थेट मानेवर वार करीत मायाला संपवले.



## गीताही गजाआड

सिव्हिल लाईन्सच्या जवाहर वसतिगृहाजवळ दिवसाढवळ्या माया मदन पासेरकर (४९) या महिलेची बुधवारी दिवसाढवळ्या भररस्त्यावर चाकूने गळा चिरून हत्या करण्यात आली. या प्रकरणात पोलिसांनी मायाचा जावई मुस्तफा खान याला अटक केली होती. चौकशीत या कटात मायाची सावत्र मुलगी गीताही सामील असल्याचे पुढे आले आणि पोलिसांनी तिलाही बेड्या ठोकल्या. गीता देखील हत्येच्या कटात सहभागी होती. तिने मुस्तफा खानला गुन्ह्यात मदत केली. 4 वर्षांपूर्वी गीता आणि मुस्तफा इंस्टाग्रामद्वारे एकमेकांच्या संपर्कात आले. ते प्रेमात पडले आणि दोघांनीही प्रेमविवाह केला. गीताच्या सांगण्यावरूनच मुस्तफाने मायाला ५ लाख रुपये उसणे दिले होते. माया ही रक्कम परत करण्यास टाळाटाळ करत होती. दुसरीकडे, ती गीतावर मुस्तफाला सोडण्यासाठी दबाव आणत होती. गीताने मुस्तफाला याची माहिती दिली होती. तेव्हापासून मुस्तफा संतापला होता. त्याने मायाला मारण्याचा कट रचला. गीता देखील या योजनेत सामील झाली. ती सतत मायाशी फोनवर संपर्क साधून तिचे लोकेशन माहित करून घेत होती. तिने हत्येपूर्वीही मायाला फोन केला होता. पोलिसांना सुरुवातीपासूनच तिच्यावर संशय होता. मुस्तफाच्या अटकेनंतर संपूर्ण सत्य बाहेर आले.

# गाडीचा कट आणि गमावला जीव

त्याचा गुन्हा काय तर दुचाकीने जाताना समोरून येणाऱ्या वाहन चालकांना त्याच्या गाडीचा कट लागला. घटना तशी क्षुल्लक. कानिशलात बसल्यानंतर वाद न घालता तो निघून गेला असता तर कदाचित या घटनेची पोलिसात नोंद झालीही नसती. तथापि, तोही तरूण, रक्त सळसळणारे. प्रत्युत्तर म्हणून त्यानेही थोबाडीत हाणली आणि आपलाच जीव गमावला.

जरीपटका ठाण्यांतर्गत नारा रोडवर गुन्हेगारांच्या टोळीने हैदोस घातला होता. एका हॉटेलमध्ये पार्टी करून मद्यधुंद अवस्थेत निघालेल्या या टोळीने रस्त्यावर दुचाकीचा कट लागल्यावरून एका तरुणाला जबर मारहाण केली. दगडाने मारून रक्तबंबाळ केले आणि फरार झाले. जखमीचा रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू झाला.

स्वप्निल लंकानाथ गोसावी (३२) रा. हुडको कॉलनी, जरीपटका असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून दोन आरोपींना अटक केली आहे. भूपेश सुरेंद्र वंजारी (२७) रा. बाराखोली, इंदोरा आणि रवी भोलानाथ बॅनर्जी (२७) रा. ओमनगर, कोराडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

मुख्य आरोपी सूजल उर्फ ऐमी राजेश म्हैसकर (२२), अक्षित अंबादे, सूजल सिंधी आणि अभि सर्व रा. रिपब्लिकन नगर, नवीन इंदोरा, हे अनेक दिवस फरार होते.

स्वप्निल एका व्यावसायिकाच्या



गोदामात सुपरवायझर होता. त्याला पत्नी आणि दोन लहान मुले आहेत. मुख्य आरोपी ऐमी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे आणि त्याच्यावर अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. गतवर्षी पोलिसांनी त्याला शस्त्रासह अटक केली होती. तीन दिवसांपूर्वीच तो कारागृहातून सुटला होता.

काही दिवसांपूर्वीच रात्री ऐमी व त्याच्या साथीदारांनी जरीपटकाच्या सिंध मराठा हॉटेलमध्ये पार्टी केली. रात्री १०.४५ वाजताच्या सुमारास मद्यधुंद होऊन आरोपी हॉटेलमधून निघाले.

याच दरम्यान स्वप्निल आपले काम आटोपून दुचाकीने घरी जात होता. नारा रोडवर लखन चायनीजसमोर स्वप्निलच्या गाडीचा रवी बॅनर्जीच्या गाडीला कट लागला.

धावत्या वाहनावरच रवीने स्वप्निलच्या कानशिलात लगावली. यामुळे स्वप्निल चिडला. त्याने गाडी थांबवून रवीला मारहाण सुरू केली. इतर आरोपी रवीच्या मदतीला आले. मात्र ते सर्व मिळूनही स्वप्निलला आवरू शकले नाही. त्याच दरम्यान एका आरोपीने रस्त्यावर पडलेला दगड उचलून स्वप्निलला मारला. स्वप्निलचा तोल जाताच ऐमीने त्याच्या डोक्यावर दगडाने वार केले. क्षुल्लक वादात एका कर्त्या तरूणाला आपला जीव गमवावा लागला.

■ ■ ■

# कुठवर लपशील गड्या?

## खुनातील आरोपीला ग्रेटर नोएडातून अटक कॅफे मालक खून प्रकरण

अंबाझरी ठाण्यांतर्गत घडलेल्या बहुचर्चित कॅफे संचालक अविनाश भुसारी हत्याकांडातील एका फरार आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. गुन्हे शाखा पोलिसांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्याला ग्रेटर नोएडा येथून अटक केली आहे.

शाहिद शेख उर्फ सलीम शेख उर्फ शाहिद अख्तर रा. तुळशीबाग, महाल असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. तो जवळपास तीन महिन्यांपासून दिल्लीच्या ग्रेटर नोएडा भागात भाड्याने खोली करून राहात होता. त्याला ट्रांजिट वॉरंटवर नागपुरात आणले आहे.



अंबाझरी ठाण्यांतर्गत १५ एप्रिल रोजी कॅफे संचालक अविनाश भुसारी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या हत्याकांडात पोलिसांनी शैलेश उर्फ बंटी हिरणवार (३१), अंकित हिरणवार (२२), आदर्श उर्फ गोट्या वाल्के (२०), शिब्बू राजेश यादव (२०) आणि रोहित उर्फ भिक्कू मेश्राम (२०) यांना अटक केली आहे.

तपासादरम्यान हिरणवार टोळीने वैमनस्यातून अविनाशच्या खुनाचा कट रचला होता. त्यासाठी त्यांनी १.२० लाखात तीन पिस्तूल खरेदी केल्या होत्या. ह्या पिस्तूल मिळवून देण्यात शाहिदने आरोपींना मदत केली होती. या प्रकरणातील अनेक आरोपी अद्यापही फरार आहेत.

खुनानंतर शाहिद फरार झाला होता. तो पोलिसांना गुंगारा देण्यासाठी वारंवार राहण्याचे ठिकाण आणि आपला फोन नंबर बदलत होता.

नागपुरातील रामनगर चौकात स्थित सोशा कॅफेचे मालक अविनाश राजू भुसारी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. मध्यरात्री घडलेल्या या घटनेत कुख्यात गुंड लांजेवार आणि त्याच्या टोळीचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले होते.

घटनेच्या रात्री अविनाश भुसारी हे निंबस कॅफेसमोर आईस गोला खात होते. त्यावेळी मोटरसायकल आणि मोपेडवर आलेल्या चार अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला. गंभीर जखमी अविनाश यांचा व्होकार्ड हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला.

पोलिसांच्या तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, लांजेवार हा गेल्या काही दिवसांपासून सोशा कॅफेत येत होता. तो कॅफेचे बिल देत नसे आणि अविनाशला नेहमी धमकी देत असे. त्या रात्री ११ वाजता लांजेवारने कॅफेत येऊन गोंधळ घातला. त्यानंतर अविनाशशी वाद घालून तो निघून गेला. काही वेळातच परत येऊन लांजेवारने पिस्तुलातून सहा गोळ्या झाडल्या. त्यापैकी तीन गोळ्या अविनाशला लागल्या. संपूर्ण घटना कॅफेतील सीसीटीव्हीमध्ये कैद झाली. अंबाझरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विवेक राऊत यांच्या नेतृत्वाखाली तपास करण्यात आला. मृतक अविनाश यांच्या वडिलांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली होती.

यापूर्वी नागपूरच्याच मानकापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गोधनी परिसरातील प्रकाशनगरमध्ये भर बाजारात गोळीबार झाल्याची घटना घडली होती.

■ ■

# विवाह समारंभांत गुंडाचे विघ्न

लग्न समारंभात सारेच वऱ्हाडी वरवधूला शुभेच्छा देण्यासाठी आले होते... लग्न विधी सुरू होण्याची प्रतिक्षा होती.. सगळीकडे आनंदीआनंद असतानाच अचानक त्या सभागृहात विघ्न आले. एकतर्फी प्रेमातून एक गुंड आणि त्याच्या साथीदारांनी मध्यस्थी करणाऱ्या निष्पाप तरूणाची हत्या केली.

फेब्रुवारी २०२५ मध्ये यशोधरानगर ठाण्यांतर्गत भिलगाव परिसरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन मंगल कार्यालयासमोर विहंग रंगारी नामक तरूणाच्या मित्राच्या बहिणीचा लग्न समारंभ सुरू होता. या दरम्यान आरोपी बिरजू वाढवे त्याच्या मित्रांसह तेथे आला. त्याचे विहंगच्या मित्राच्या बहिणीवर एकतर्फी प्रेम होते.

लग्नाला आल्यानंतर बिरजूने पाहुण्यांना शिविगाळ करण्यास सुरुवात केली. शुभ कार्यात अडथळा नको म्हणून विहंगने बिरजूला समजावण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान बिरजूने विहंगवर चाकूने हल्ला केला. बिरजूचा मित्र आरोपी आर्यन याने सिमेंटचा ब्लॉक उचलून विहंगच्या छातीवर वार केला. उर्वरित आरोपींनीही त्याला बेदम मारहाण केली. विहंगचा मित्र जखमी अवस्थेत त्याला मेयो येथे घेऊन गेला, जिथे त्याला मृत घोषित करण्यात आले. यशोधरानगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

यशोधरानगर पोलिसांनी ठाण्यांतर्गत आयोजित विवाह सोहळ्यात घडलेल्या खून प्रकरणातील फरार मुख्य आरोपी बिरजू दीपक वाढवे (३३) रा. मायानगर, जरीपटका याला तब्बल ४ महिन्यानंतर अटक केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत 9 आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला असून त्यात एका अल्पवयीनाचा देखील समावेश आहे. पोलिसांनी या प्रकरणात बिरजू आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध खून आणि मकोका अंतर्गत गुन्हा नोंदविला होता. त्याचे साथीदार सुजल दिलीप उईके, पियूष शेखर रामटेके, अजिंक्य सुरेंद्र सयाम, राहुल उर्फ दादू फकीरा वरखडे, सोनू उर्फ सोन्या अंकुश गेडाम, आर्यन लंकेश उईके, लखन दीपक वाढवे आणि यश उर्फ अक्कू पारस पाटील यांना आधीच अटक करण्यात आली आहे.

# दोस्त दोस्त ना रहा...


एकाचे मार्केटिंगचे काम... दुसरा फायनान्स कंपनीत वाहन खरेदीसाठी फायनान्सचे काम करायचा... तिसऱ्याचा घोड्यांचा व्यवसाय... तर एकजण वाहनांचे ईएमआय थकले की वाहन उचलून नेण्याचे काम करायचा.

यातील दोघांची बालपणाची मैत्री. पुढे हे सर्वच मित्र झाले. शौक करण्यासाठी सारेच एकत्र यायचे, पण.. एके दिवशी असे काय घडले की बालपणीच्या मित्राच्या जीवावरच दुसरा मित्र उठला? हर्षल अनिल सौदागर (२६) रा. लाल शाळेजवळ, लकडगंज, नागपूर, या तरूणाला जीव का गमवावा लागला?

हर्षल आणि मुख्य आरोपी वैभव हे बालपणाचे मित्र होते. मृतक हर्षल हा हप्ते थकले की दुचाकी वाहन जमा करण्याचे काम करायचा. तर आरोपी वैभव हा एका फायनान्स कंपनीत वाहन खरेदीसाठी फायनान्सचे काम करतो. त्याचा साथीदार प्रज्वल कानारकर हा मार्केटींगचे तर प्रज्वल डोरले हा घोड्यांचा व्यवसाय करतो.

दीड महिन्यापूर्वी एक लोन वर घेतलेल्या वाहनाचे हप्ते थकले की, हर्षल वाहन उचलून कंपनीत जमा करायचा.

रविवार २७ जुलैच्या रात्री १२ वाजताची ही थरारक घटना. प्रज्वल उर्फ फारूख नामदेव कानारकर (२४) रा. गंगाबाग-पारडी, प्रज्वल उर्फ पज्जू सुधाकर डोरले (२४) रा. नवाबपुरा-कोतवाली, वैभव उर्फ कंडोम हिरामण हेडाऊ (२८) आणि राहुल उर्फ दद्या दशरथ शेटे (३३) दोन्ही रा. गुजरी चौक, जुनी मंगळवारी हे गुजरी चौकात दारू पीत बसले होते.



वाहन जप्त केल्यावरून वैभव आणि हर्षल या दोन मित्रांमध्ये वाद झाला होता. कदाचित तेंव्हापासून हर्षलविषयी वैभवच्या मनात राग असावा. दारू ढोसत बसलेल्या त्या चारही जणांजवळ हर्षल भरधाव मोटारसायकल चालवत आला आणि त्यांच्यापासून काही अंतरावर त्याने ब्रेक लावला.

यावरून आरोपींनी त्याला शिविगाळ केली आणि हाणामारी सुरू झाली. या दरम्यान वैभवने घरी जाऊन चाकू आणला. हर्षलवर सपासप वार करीत रक्ताच्या थारोळ्यात लोळवून आरोपी पसार झाले. स्थानिक नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली.

लकडगंज पोलिस घटनास्थळी पोहोचले. तोपर्यंत हर्षलचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रवाना केले. चारही आरोपींचा जुना गुन्हेगारी रेकॉर्ड आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने काही तासातच चारही आरोपींना अटक केली. हर्षलचे काका सुधीर सौदागर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अगदीच क्षुल्लक कारणावरून एका तरूणाबांड युवकाला हकनाक जीव गमवावा लागला.

■ ■

# पैशाचा वाद आणि कुख्यात गुंडाचा खून



पैशाच्या वादातून आदिवासीनगर खदान, गोंडवाना चौक येथे राहणाऱ्या अजय मुरलीधर गाते (३१) या कुख्यात गुंडाचा मंगळवारच्या मध्यरात्री दगडाने ठेचून खून करण्यात आला.

मृतक अजयवर खुनाचे दोन गुन्हे दाखल आहेत. त्याचप्रमाणे वस्तीत तो अवैधपणे दारू विक्री करीत असे. नेहमीच तो वस्तीतील लोकांना पैशाची मागणी करीत असे. पैसे मिळत नसल्याने तो लोकांना जिवे मारण्याची धमकी देत असे. काही दिवसांपूर्वी त्याने करण यादव, अमन यादव आणि इतर आरोपींना पैशाची मागणी केली होती. आरोपींनी त्याला पैसे देण्यास नकार दिला होता. त्यावरून त्यांच्यात वाद सुरू होता. घटनेच्या दिवशी सकाळी सुद्धा त्याने आरोपींना पैशाची मागणी केली होती. आरोपींनी त्याचा फोन उचलला नव्हता. त्यामुळे अजयने आरोपींना शिवीगाळ केली होती. त्यामुळे आरोपी संतप्त झाले. त्या दिवशी दिवसभर अजय आणि आरोपी यांच्यात फोनवर बोलणी सुरू होती. शेवटी आरोपींनी त्याला रात्रीला पैसे देतो असे म्हटले. त्यानुसार मध्यरात्री १२.३० च्या सुमारास अजय हा गोंडवाना चौकातील ताजुद्दीन बाबा दर्ग्याजवळ गेला. त्यावेळी तो कुणाशीतरी बोलत होता.

आरोपी करण यादव, अमन यादव, अखिलेश, अनुप आणि इतरांनी दगड, विटा आणि शस्त्राने अजयवर हल्ला केला. दगडाने त्याचे डोके आणि तोंड ठेचून त्याला जागीच ठार केले. याप्रकरणी सदर पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून अखिलेश ज्ञानेश्वर कंगाली (२४), अनुप उर्फ करण जय कनोजिया (२०) समतानगर आणि मुकेश उर्फ अमन चैतू उईके (१९) राजनगर यांना अटक केली. इतर आरोपींना नंतर अटक केल्याची माहिती पुढे आली आहे.